www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 | अंक : ६९ | सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




## जागतिक मधुमेह दिनी भुवन आ. वाडी शाळेत सी.एच.ओ. महेश चाटे, आरोग्य सेवक सुधीर खैरे व आरोग्य सेविका चंचला मोरे यांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**बोरघर :** रायगड जिल्हा परिषद शाळा भुवन आदिवासी वाडी येथे शुक्रवार दिनांक १४ / ११ / २०२५ रोजी जागतिक मधुमेह दिन साजरा करण्यात आला सदर कार्यक्रमात सी.एच.ओ.चाटे आणि सुधीर गणपत खैरे आरोग्य सेवक रातवड प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर व आरोग्य सेविका सी.एन.मोरे यांनी मार्गदर्शन केले.

आरोग्य सेवक सुधीर गणपत खैरे आयुष्यमान आरोग्य मंदिर रातवड प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथे कार्यरत असून त्यांचा जनसंपर्क चांगला असून ते नियमितपणे व मनोभावे, लोकांची सेवा करीत असतात व घरोघरी जाऊन आरोग्य शिक्षण, व मार्गदर्शन करीत असतात. सदर प्रसंगी त्यांनी मधुमेह आजारावर काळजी कोणत्या पद्धतीने घेऊन आजार नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रयत्न करणे व्यायाम करणे औषध उपचार नियमितपणे घेणे व औषध उपचार



प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथे मोफत आहे असे सांगितले व आजारा बाबतीत आरोग्य शिक्षण व मार्गदर्शन केले.

तसेच रा.जि.प.शाळा भुवन आदिवासी वाडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांची नखे दात कान तपासणी केली.सदर वेळी पी.एम.जनमान टीम यांनी गावातील लोकांनी तपासणी केली व आरोग्य शिक्षण देण्यात आले.सदर वेळी रा.जि.प.शाळेचे मुख्याध्यापक हेमंत बारटक्के तसेच वैधकिय अधिकारी माणगाव डॉ.उभारे,कासार,बक्कम व दाभेकर यांचा समवेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# नवी मुंबई विमानतळावरून २५ डिसेंबर २०२५ रोजी पहिले विमान भरारी घेणार !

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

नवी मुंबई विमानतळाच्या निर्मितीच्या शुभारंभा पासून पूर्ण होईपर्यंत सातत्याने नामांतराच्या गर्तेत सापडले असणारे नवी मुंबईचे विमानतळ, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 अक्टोबर 2025 रोजी उद्घाटन करून देशासाठी लोकार्पण केले परंतु आजही नामांतराचा तिढा सुटलेला नसला तरी सदर विमानतळ वरून व्यवसाईक दृष्ट्या पहिले विमान नाताळसणाचे




औचित्य साधून 25 डिसेंबर 2025 मध्ये आकाशात झेप घेणार असून प्रवाश्यां करिता खुले होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 अक्टोबर 2025 रोजी नवी मुंबईचे विमानतळाचे उद्घाटन करून देशासाठी लोकार्पण केल्या नंतर येथून आजपर्यंत व्यवसाईक दृष्ट्या कोणत्याच प्रकारची विमान वाहतूक सेवा सुरु करण्यात आली नव्हती, परंतु आत्ता बहुप्रतीक्षेत असणाऱ्या नवी मुंबईच्या विमानतळा वरून 25 डिसेम्बर 2025 पासून सामान्य प्रवाश्यांसाठी विमान वाहतुक खुली होणार आहे.

सध्या व्यवसाईक दृष्ट्या मुंबई विमानतळा वरून गोवा, कोलकात्ता,अहमाबाद,नागपूर ,दिल्ली केरळ आदि ठिकाणी विमाने आकाशात भरारी घेणार आहेत. यासाठी एअर इंडिया एक्सप्रेस,इंडिगो.आणि अकासा या तीन विमान कंपन्या स्पर्ध्येमध्ये उतरल्या असून नवी मुंबई विमानतळा वरून वरील ठिकाणीया कंपन्या विमान सेवा देणार आहेत,याबाबत तिकीट बुकिंग केंव्हा सुरु होणार याकडे प्रवाश्यांचे लक्ष लाऊन राहिले आहे. त्याच बरोबर मुंबई विमानतळावरून कोणत्या कंपनीचे विमान आकाशात पहिली भरारी घेणार याची चर्चा प्रवासी वर्गात सुरु असली तरी "लोकनेते दि.बा.पाटील" यांचे नाव मुंबई विमानतळा देण्याचा नामांतराचा प्रश्नावर प्रकल्पग्रस्त आजही ठाम आहेत.

## व्यसनमुक्त पिढी घडविण्यासाठी लायन हार्ट ग्रुप नवी मुंबई तर्फे व्यसनमुक्त शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर :** व्यसनामुळे विद्यार्थीदशेत युवा पिढी वाया जात आहे. दारू किंवा अमली पदार्थाचा वापर केला जातो. पैशांचा गैरवापर, मार्गदर्शनाचा अभाव, उत्सुकता, संगत अशा काही कारणांमुळे व्यसनाधीनता हा मानसिक रोग होत व्यसन आणि त्याचे दूरगामी परिणाम माहीत असून त्यापासून परावृत्त वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिझनेस मॅनेजमेंट आणि लायन हार्ट ग्रुप, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती कार्यशाळेचे आयोजन बुधवारी आता १५ नोव्हेंबर २०२५ रोजी विश्वेश्वर एज्युकेशन सोसायटीचेवेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड बिझसेन मॅनेजमेंट सेक्टर - ९, सानपाडा, नवी मुंबई येथे व्यसनमुक्ती कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन माननीय डॉ. अजित मगदूम (प्राचार्य



आणि संचालक, अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, वाशी) करतील. या कार्यक्रमाचे आयोजक श्री. विरेंद्र यशवंत म्हात्रे (लायन हार्ट ग्रुप नवी मुंबईचे संस्थापक, नवी मुंबई भूषण पुरस्कार प्राप्त)हाज्जी शाहनवाज खान (सामाजिक कार्यकर्ते) समाजभषण श्री. उत्तम तरकसे आसरडोहकर (वरिष्ठ कवी, साहित्यिक विचारवंत, महाराष्ट्र पोलिस दल - नवी मुंबई गुन्हे शाखा) श्री. भीमसेन तपासे (अध्यक्ष, लुंबिनी वृक्ष संवर्धन संघटना, बेलापूर, नवी मुंबई) डॉ. मित्या वर्गीस (प्राचार्य, आय.आय. व्ही.एम. शिक्षण) विक्की वांडे (अभिनेता यांनी अनेक मराठी मालिकेत काम केले आहेत दुर्वा, छोटी मालकिण, एक घर मंतरलेले ,सावधान इंडिया, आनंदी हे जग सारे, आणि हिंदी गाणी धूप का करझ , आणि इतर अनेक मालिकेत सुद्धा काम केले आहे सामाजिक कार्यकर्ते म्हणुन त्याना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे यांना 100 हून अधिक पुरस्काराने सन्मानित ), मा.रवीश मोमीन ( समाजसेवक ) वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिझनेस मॅनेजमेंट चे व्यवस्थापन अभ्यास विभाग प्रमुख: सहाय्यक प्राध्यापक कझनफर खान व्यासपीठावर उपस्थित होते.तर विश्वेश्वर एज्युकेशन सोसायटीचेवेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड बिझसेन मॅनेजमेंट उपस्थित होते त्या विद्यार्थ्यांना लायन हार्ट ग्रुप नवी मुंबई तर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक प्राध्यापक सह एनएसएस कार्यक्रम अधिकारी: बरकाथू निशा. आर,सहायक प्राध्यापक: अभिषेक गुरव, सहायक प्राध्यापक: कुलदीप प्रभू ,प्रयोगशाळा सहाय्यक - संदेश पडवळ. मुख्याध्यापक,शिक्षक,सामाजिक संघटनांचे सदस्य उपस्थित होते.

नवी मुंबई शहरातील विद्यार्थ्यांना व्यसनापासून दुर ठेवण्यासाठी घरोघरी जावून जनजागृती करणार असल्याचे मार्गदर्शन माननीय डॉ. अजित मगदूम (प्राचार्य आणि संचालक, अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, वाशी) करतील. या कार्यक्रमाचे आयोजक श्री. विरेंद्र यशवंत म्हात्रे (लायन हार्ट ग्रुप नवी मुंबईचे संस्थापक, नवी मुंबई भूषण पुरस्कार प्राप्त) यांनी प्रास्ताविकातून सांगितले. चटकन नशा, गुंगी आणणारे पदार्थ याचा वापर वाढला आहे आणि हे खूप महागडे यामध्ये अल्कोहोल, चरस, गांजा, सिगारेट, ड्रग्स, कोकेन, ओपीऑईडस् याशिवाय व्हाईटनर, ब्राऊन शुगर यांसारख्या वेगवेगळ्या नशा वेगवेगळ्या माध्यमातून करत असल्याचे आढळून येत आहे. याचा परिणाम मानसिक आरोग्यावर होत आहे. याचा वापर मोठ्या शहरांमध्ये जास्त प्रमाणात होत आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त भव्य विज्ञान प्रयोग प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदर लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त वर्षभर विविध स्पर्धा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड मधील सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर सिबिएसई स्कुल येथे भव्य विज्ञान प्रयोग प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ज्याचे नाव प्रग्या 1.0 द पावर ऑफ असस्टेनेबल फ्युचर असे ठेवण्यात आले होते. ज्याचे उद्घाटन सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर व सौ अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये ग्रुप अ,ब, क यामध्ये पनवेल व उरण विभागातील सुमारे 13 शाळांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर सिबिएसई स्कुलचे चेअरमन व माजी सभागृह नेते परेश ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, स्थानिक स्कूल कमिटी मेंबर कविता खारकर, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, तसेच रयतचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, पिआरओ बाळासाहेब




कारंडे, डी.सी पाटील, रयत रालिपिक संतोष गुजर, परीक्षक अनिल कौशिक व चेतन कौशिक आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रदर्शनामध्ये भविष्यातील एआय आधुनिक तंत्रज्ञान व विविध विषयांवर वेगवेगळे प्रयोग प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले होते व पुरातन विषयांमध्ये रायगड किल्ला, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाणी व तलवारी भाले मराठी भाषा विभाग हिंदी भाषा विभाग व इंग्रजी भाषा विभाग यांची सांगड घालत दर्जेदार प्रयोग ठेवण्यात आले होते याप्रसंगी परेश ठाकूर यांनी भविष्यामध्ये प्रग्या 1.0 या 2.0, 3.0 होत जाओ अशा शुभेच्छा दिल्या व लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या प्रयोगाचे कौतुक करत असताना छोट्या शास्त्रज्ञांसाठी प्रयोगशाळा बांधणार असल्याचे आश्वासित केले.




## महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक वारसदार म्हणून केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा मंगळवारी स्टार महाराष्ट्र तर्फे होणार भव्य सत्कार

### स्टार महाराष्ट्र अवॉर्डचा येत्या 18 नोव्हेंबर रोजी रवींद्र नाट्य मंदिर सभागृहात रंगणार पुरस्कार वितरण सोहळा

*दैनिक युवक आधार*
*सहसंपादक मुकुंद कांबळे*

**मुंबई :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे वैचारिक वारसदार म्हणून रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांचा साप्ताहिक स्टार महाराष्ट्र तर्फे हिंदू; मुस्लिम; शीख ;ख्रिस्ती ; जैन आणि बौद्ध धर्मगुरूच्या हस्ते भव्य सत्कार येत्या मंगळवार दिनांक 18 नोव्हेंबर 2025 रोजी सायंकाळी 5 वाजता रविंद्र नाट्य मंदिर प्रभादेवी दादर मुंबई येथे करण्यात येणार आहे अशी माहिती संयोजक हेमंत रणपिसे यांनी दिली आहे.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा रिपब्लिकन पक्ष हा राजकीय वारसा आहे. रिपब्लिकन हा वारसा चालविण्याचे काम आणि देशभर रिपब्लिकन. वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम केंद्रिय राज्यमंत्री ना रामदास आठवले करीत आहेत. त्यामुळेच महामानव डॉ. बाबासाहेब



आंबेडकरांचे खरे वैचारिक वारसदार म्हणून न. रामदास आठवले यांचा भव्य गौरव स्टार महाराष्ट्र तर्फे करण्यात येणार आहे.महाराष्ट्र राज्य ही भूमी इतिहास घडविणाऱ्या आणि राष्ट्र घडविणाऱ्या रत्नांची भूमी आहे. कला संस्कृती साहित्य सर्व क्षेत्रात समृद्ध असणारी ही भूमी आहे. संतांचा आणि महापुरुषांचा आदर्श घेऊन चालणारी महाराष्ट्र ही सर्वार्थाने समृद्ध भूमी आहे. शिक्षण कला साहित्य पत्रकारिता पोलिस प्रशासन समाजसेवा विज्ञान क्रीडा नाट्य सिनेमा आणि राजकारण सहकार अशा विविध क्षेत्रात महाराष्ट्राला अधिक समृद्ध करण्यासाठी आपापल्या क्षेत्रात आपापल्या क्षमतेने कार्यरत असणाऱ्या गुणीजनांना दरवर्षी साप्ताहिक स्टार महाराष्ट्र च्या वतीने स्टार महाराष्ट्र अवॉर्ड देऊन गौरविले जाते.यंदा स्टार महाराष्ट्र अवॉर्ड 2025 चा शानदार सोहळा येत्या मंगळवार दिनांक 18 नोव्हेंबर रोजी मुंबईत प्रभादेवी दादर येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. स्टार महाराष्ट्र अवॉर्ड या प्रतिष्ठित पुरस्कार सोहळ्यास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित राहणार असून या सोहळ्यास खासदार उज्ज्वल निकम; रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले; सहकार मंत्री बाबासाहेब पाटील; कॅबिनेट मंत्री दर्जा प्राप्त स्वयंपुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष आमदार आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर; आमदार राम कदम; भाजप नेत्या आमदार चित्रा वाघ ;आमदार प्रसाद लाड ; आमदार कालिदास कोळंबकर झी 24 तास चे संपादक कमलेश सुतार; ए बी पी माझा च्या कार्यकारी संपादक सरिता कौशिक आदींना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पत्रकारितेत योगदान देणाऱ्या निवडक पत्रकारांना स्टार महाराष्ट्र अवॉर्ड ने गौरविण्यात येणार आहे. त्यात टीव्ही 9 चे इन पुट संपादक मोहन देशमुख ; ज्येष्ठ पत्रकार योगेश त्रिवेदी; महाराष्ट्र टाईम्स चे पत्रकार सौरभ शर्मा; नवभारत चे वरिष्ठ पत्रकार अखिलेश कुमार मिश्रा; ; दैनिक सकाळ चे मुंबईचे ब्युरो चीफ विनोद राऊत; नवशक्ती चे संपादक प्रकाश सावंत; ज्येष्ठ पत्रकार प्रमोद डोईफोडे; पत्रकार प्रशांत बढे; पत्रकार रुपाली बडवे; पुण्य नगरी चे मुंबई संपादक विशाल राजे; दैनिक सम्राट चे संपादक कुणाल कांबळे; दैनिक लोकनायक चे बुद्धभूषण गोटे; संपादक संतोष कोठावदे; पत्रकार सुशांत पाटील; लोकसत्ता चे अशोक अडसूळ; भगवान परब; राजू झनके;अ‍ॅड. स्मिता चिपळूणकर; लॉर्ड बुद्ध टीव्ही चे संपादक सचिन मून आदी अनेक मान्यवरांना स्टार महाराष्ट्र अवॉर्ड ने गौरविण्यात येणार आहे. साप्ताहिक स्टार महाराष्ट्र चा यंदा 14 वा वर्धापन दिन असून या निमित्त स्टार महाराष्ट्र अवॉर्ड 2025 चा शानदार सोहळा मंगळवार दिनांक 18 नोव्हेंबर रोजी दुपारी 4 ते रात्री 8 वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास मराठी आणि हिंदी नामवंत कलाकार सेलिब्रिटी उपस्थित राहणार आहेत. अभिनेत्री माधुरी पवार यांच्या नृत्याची झलक तसेच कलर्स ऑफ महाराष्ट्र हा मराठी वाद्यवृंद आणि गाणी नृत्य लावणी आदी सांस्कृतिक कार्यक्रम सुरू राहणार आहेत. स्टार महाराष्ट्र अवॉर्ड सोहळ्यास येत्या दिनांक 18 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी 4 ते रात्री 8 वाजे पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन साप्ताहिक स्टार महाराष्ट्र चे संपादक हेमंत रणपिसे यांनी केले आहे.

# करडा पंचायत समितीसाठी अर्जुन पाटील खरात यांना व्यापक जनसमर्थन

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**रिसोड :-** गेल्या तीन दशकांपासून सामाजिक कार्याचा विडा उचलत सातत्याने जनसेवा करणारे अर्जुन पाटील खरात आता करडा पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.आमदार अमित झनक यांच्या नेतृत्वाखाली करडा गणातून उमेदवारीची तयारी सुरू असून सर्वसामान्य जनतेतून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.दीर्घकाळ सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले अर्जुन पाटील हे आमदार अमित भाऊ झनक यांचे कट्टर एकनिष्ठ कार्यकर्ते. सामाजिक उपक्रम,संकटकालीन मदत आणि सर्वसामान्यांचा आवाज बनणे— हे त्यांचे कार्य सातत्याने सुरु आहे. कोरोनाकाळातही अत्यंत जोखमीच्या परिस्थितीत गरजूंना मदत,औषधे,अन्न साहित्य, जनजागृती अशा विविध उपक्रमांद्वारे त्यांनी मोलाचे योगदान दिले.संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून शेतकरी,कष्टकरी, महिलावर्ग आणि शेवटच्या घटकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने चळवळ उभी केली.

याचबरोबर आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे,नेत्र तपासणी, युवकांसाठी रोजगार मार्गदर्शन, उद्योगस्थापना प्रोत्साहन अशा उपक्रमांतून त्यांनी मोठा जनसंपर्क आणि विश्वास निर्माण केला.“अहद ऑस्ट्रेलिया–तहद कॅनडा” अवघा मुलुख आपला या कल्पनेतून परदेशातील रोजगार मार्गदर्शन देत अनेकांना




संधी उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे स्वतः शेतीशी घट्ट नाते ठेवून आधुनिक शेतीपद्धती, उत्पादनवाढ यावर त्यांनी प्रयोग केले.

या सर्व कामांचा प्रभाव जनमानसावर उमटला असून करडा पंचायत समिती गणातील मतदार त्यांच्या बाजूने उभे राहिल्याचे चित्र दिसत आहे. सामाजिक बांधिलकी, एकनिष्ठता आणि कार्यक्षम नेतृत्व यांमुळे अर्जुन पाटील खरात यांचे नाव आज सर्वत्र चर्चेत आहे.

# घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा येथे क्रांतिकारी बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी- महेश पेन्दोर**

आदिवासी समाजाचे प्रेरणास्रोत आणि महान स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांची जयंती घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पारंपरिक ढोल-नगाऱ्यांच्या गजरात काढण्यात आलेल्या भव्य रॅलीने संपूर्ण गाव ढवळून निघाले.

गावातील तरुण-तरुणींनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे रूप साकारत पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतलेला असल्याने गावातील वातावरण पूर्णपणे उत्साह आणि चैतन्याने भारलेले होते. रॅली गावातील प्रमुख रस्त्यांवरून



फिरत असताना 'जय बिरसा', 'आदिवासी एकता' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले श्री. रवी कुमरे सर यांनी युवा पिढीला मोलाचा संदेश दिला. ते म्हणाले, "बिरसा मुंडा वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी अन्यायाविरुद्ध उठले आणि आदिवासी समाजाच्या भविष्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. मात्र, आजची युवा पिढी व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकून आपले आयुष्य खराब करत आहे."

त्यांनी तरुणांना 'गुलाम नका होऊ, मालक व्हा' असे भावनिक आवाहन करत बिरसा मुंडा यांच्या त्यागातून प्रेरणा घेण्याचे आणि व्यसनमुक्त जीवन जगण्याचे आवाहन केले.

मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला गावातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती लाभली.



अध्यक्ष: श्री. सखाराम कुळसंगे (महाजन, गाव)

प्रमुख पाहुणे: श्री. दत्ता कुमरे, कर्णु पेंदोर, हरिदास घोडाम, पुणाजी मेश्राम, उल्हास कनाके, बिरबल आडे, मारोती मडावी, शंकर धुर्वे, नंदू गेडाम, सचिन केळझरकर.

विशेष उपस्थिती: पो. पाटील गणेश कुमरे, पत्रकार दिनेश नडपेलवार आणि पत्रकार महेश पेंदोर.

श्री. सखाराम कुळसंगे यांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला आणि आदिवासी समाजाला स्वाभिमान, हक्क, स्वातंत्र्य आणि संघर्षाची प्रेरणा देणारे बिरसा मुंडा यांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले.

यशस्वी समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभारप्रदर्शन श्री. महेश कनाके यांनी केले. गावकरी, तरुण-तरुणी आणि महिला-बाळांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे ही बिरसा मुंडा जयंती भव्य, यशस्वी आणि अविस्मरणीय ठरली. कार्यक्रमाच्या शेवटी 'शिक्षण, एकता आणि जंगल-जमीन-जीवनाचे संरक्षण' या मूल्यांसह बिरसा मुंडा यांचे विचार पुढे नेण्याची सर्वांनी प्रतिज्ञा घेतली.

# विविध भाषांच्या आदान आणि प्रदानातून संस्कृतीचा विकास होतो : आशिष शेलार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी :** ‘भाषा ही वादासाठी नव्हे तर संवादाचे माध्यम आहे. विविध भाषांच्या आदान–प्रदानातून संस्कृतीचा विकास होत असतो. हिंदी पत्रकारिता द्विशताब्दी वर्षानिमित्त आयोजित मराठी–हिंदी संपादक पत्रकारांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन हे त्या दिशेने टाकलेले एक स्तुत्य आणि उत्तम पाऊल आहे,’ अशा शब्दांत महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी कौतुकाची भावना व्यक्त केली.

मुंबई मराठी पत्रकार संघ आणि काशी–वाराणसी विरासत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय हिंदी पत्रकारिता द्विशताब्दी साहित्य व मीडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या आझाद मैदान येथील पत्रकार भवनात आयोजित या सोहळ्यात देशभरातील १७ राज्यांतील संपादक, लेखक, अभ्यासक आणि पत्रकार सहभागी झाले होते. महाराष्ट्र राज्य साहित्य अकादमी, केंद्रीय शिक्षण मंत्रालय तसेच उत्तर प्रदेश शासनाचे सहकार्य या महोत्सवाला लाभले.हिंदीतील पहिले वृत्तपत्र ‘उदन्त मार्तण्ड’ याच्या प्रकाशनाला यंदा २०० वर्षे




पूर्ण झाली. या निमित्ताने हिंदी पत्रकारितेच्या इतिहासातील मोलाच्या योगदानासाठी ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, कमलेश सुतार, रेखा देशपांडे, विश्वास देवकर, शरद वैद्य (मरणोत्तर) यांना सन्मानित करण्यात आले. शरद वैद्य यांचा पुरस्कार त्यांचे सुपूत्र अजय वैद्य यांनी स्वीकारला.यावेळी हिंदी पत्रकारितेतील भीष्माचार्य आणि कोकणचे सुपुत्र पत्रकार महर्षी कै. बाबूराव पराडकर यांचे स्मारक त्यांच्या मुळगावी सिंधुदुर्गात पराड येथे व्हावे अशी विनंती मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी मंत्री आशिष शेलार यांना केली. ‘राष्ट्रपती’सारखे अनेक शब्द हिंदी भाषेला पराडकरांनी दिल्याचा उल्लेखही यावेळी त्यांनी केला.या महोत्सवाचे उद्घाटन आसामचे महामहिम राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी दूरदृष्य प्रणालीव्दारे केले. भाषेच्या माध्यमातून पत्रकार विचारांचे आदानप्रदान करतायत आणि त्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघ आणि काशी विरासत फाऊंडेशनने पुढाकार घेतला असल्याचे कौतुक करत त्यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमामुळे मराठी–हिंदी पत्रकारिता, भाषा संवाद आणि राष्ट्रीय पत्रकारिता अशा वैचारिक परंपरेचा नवा दुवा निर्माण झाल्याचा विश्वास काशी विरासत फाऊंडेशनचे राममोहन पाठक यांनी व्यक्त केला आहे.या दोन दिवसीय सोहळ्यात ‘भारत : साहित्य आणि मीडिया महोत्सव’ अंतर्गत विविध चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

या चर्चासत्रात प्राध्यापक सोमा बन्द्योपाध्याय (कुलपति, शिक्षक प्रशिक्षण राज्य विश्वविद्यालय कोलकाता), इस्कॉनचे मुख्य ट्रस्टी प्रभु सूरदासजी, काशी विरासत फाउंडशनचे कार्याध्यक्ष राम मोहन पाठक, केन्द्रीय हिंदी निदेशालयाचे निदेशक हितेंद्र मिश्र. सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, डॉ. अमिता दुबे आणि के. एन. श्रीवास्तव उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी स्वतःवर विश्वास ठेवला तर अडथळेही पायऱ्या बनतात” — वि. भा. साळुंके

### कडा महाविद्यालयात ‘व्यक्तिमत्व विकास’ विषयावर साळुंके यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा ता. आष्टी बाळासाहेब रकटाटे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या गांधी महाविद्यालय व अमोलोक जैन प्रसारक मंडळ संचलित विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कडा यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकास व जीवनमूल्ये या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन साहित्यिक कवी आदर्श शिक्षक श्री. विभा साळुंके यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या प्रसंगी सुप्रसिद्ध वक्ते, व विद्यार्थीप्रिय मार्गदर्शक वि. भा. साळुंके यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत परिणामकारक व्यक्तिमत्वाची जडणघडण, सकारात्मक विचारांची शक्ती, आत्मविश्वास, संवादकौशल्य, वेळेचे नियोजन आणि उद्दिष्टपूर्ती या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.“विद्यार्थ्यांनी स्वतःवर विश्वास ठेवला तर अडथळेही पायऱ्या बनतात,” असा प्रेरणादायी संदेश देत साळुंके यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून जीवनातील अडचणींचा सामन्यासाठी जिद्द आणि धैर्याची गरज पटवून दिली. सकारात्मकता, चिकाटी आणि सातत्य या तीन गोष्टी यशाचा पाया असल्याचे त्यांनी सांगितले.साळुंके यांनी आपल्या अनुभवसंपन्न शैलीत विद्यार्थ्यांना स्वतःचा विकास कसा साधावा, वेळेचे महत्त्व, जीवनातील उद्दिष्ट निश्चिती आणि त्यासाठी आवश्यक कृती



या बाबींवर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वामुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनिल गर्जे यांनी केले. तसेच डॉ. राजकुमार थोरवे यांनी विद्यार्थ्यांसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य श्री भंडारी यांनी साळुंके यांच्या मार्गदर्शनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना या विचारांचा जीवनात उपयोग करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्री भंडारी, डॉ. राजू थोरवे, प्रा. गर्जे, प्रा. वाघोली, श्री. संजय कासार यांसह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.महाविद्यालयात राबविण्यात येणारे असे उपयुक्त उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता, आत्मविश्वास, व्यक्तिमत्व वृद्धी आणि करिअरविषयक जागरूकता निर्माण करण्यास अत्यंत मोलाचे ठरतात, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.




# नामदार भरतशेठ गोगावले यांच्या लोककल्याणकारी कार्यतत्पर कार्यकुशल नेतृत्वाचा वाढता प्रभाव

## शिवसेनेत दिवसेंदिवस इनकमिंग सुरूच, दहिवली कोंड,पालकरवाडी, उमरोळी आणि पेण तर्फे तळे येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड )**

माणगाव तालुक्याच्या मोर्बा विभागातील दहिवली कोंड, पालकरवाडी आणि खरवली विभागातील उमरोळी व पेण तर्फे तळे गावातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लोकप्रिय नामदार भरतशेठ गोगावले यांच्या कार्यतत्पर, कार्यकुशल आणि लोककल्याणकारी नेतृत्वावर प्रभावीत होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अखेरचा जय महाराष्ट्र करत शिवसेनेत जाहिर पक्ष केला.

माणगाव तालुक्याच्या पेण तर्फे तळे येथील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत उत्स्फूर्त प्रतिसाद देत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. माणगाव तालुक्यातील पेण तर्फे तळे ग्रामस्थ महिला भगिनींसह अनेक कार्यकर्त्यांनी नामदार मंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवबंधन हातात बांधले.या कार्यक्रमादरम्यान पेण येथे नव्याने उभारण्यात आलेल्या शिवसेना शाखेचे उद्घाटन मंत्री गोगावले आणि मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. ग्रामस्थांचा सहभाग, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नव्या शाखेमुळे या भागातील संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. या पक्ष प्रवेशामुळे पेण तर्फे तळे परिसरातील शिवसेनेची ताकद व जनसंपर्क अधिक वाढणार असून पक्ष बांधणीला नवचैतन्य मिळाले आहे.दिवसेंदिवस माणगाव तालुक्याच्या विविध विभागांतील गावंच्या गावं नामदार भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करत आहेत त्यामुळे शिवसेनेत दररोज मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरूच आहे. शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी माणगाव तालुका, खरवली विभागातील उमरोली येथील ग्रामस्थ महिला भगिनी आणि कार्यकर्त्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत





शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश करून राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडवली आहे. अनेक वर्षे राष्ट्रवादी पक्षात राहूनही गावात ठोस विकासकामे न झाल्याची खंत महिलांनी व्यक्त केली. “आमच्या भागाचा विकास होत नाही... आमचा आवाज वरच्या पातळीपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे आम्ही गोगावले यांच्या नेत्रतवावर आणि शिवसेनेवर विश्वास ठेवून प्रवेश करत आहोत” असे त्यांनी स्पष्ट सांगितले. शिवसेनेच्या विकासकार्यातील गती आणि गावागावातील जनसमर्थन पाहता उमरोली ग्रामस्थ भगिनींचा हा निर्णय माणगाव तालुक्यातील बदलाची नवी दिशा ठरत आहे.

**माणगाव तालुक्याच्या मोर्ब विभागातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश**

दहिवली कोंड पालकरवाडी येथील राष्ट्रवादी आणि भाजपा पक्षातील कार्यकर्त्यांनी नामदार मंत्री भरत शेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेते जाहीर पक्ष प्रवेश केला.या वेळी अतिफ टाके, साहिल सतवे, हेमंत पालकर, बासित बंदरकर, हुजेब टाके, रमेश कोळी, संदेश मांडवकर,अमाद बंदरकर, सोहम जाधव ओमकार जाधव, राजबा जाधव इत्यादिनी मान्यवरांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.या पक्ष प्रवेशा वेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, युवा जिल्हा अधिकारी विपुल उभारे, तालुका प्रमुख महेंद्र मानकर, तशेच तालुक्यातील शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी शिवसैनिक इत्यादी उपस्थित होते.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# शेल्टर होमची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत भटक्या कुत्र्यांवर कारवाई करू नये

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** न्यायालयाच्या आदेशानंतर मुंबईतील भटक्या कुत्र्यांवर अत्यंत घाईघाईने व अन्यायकारक कारवाई करण्यात येत आहे या विरोधात आज शिवाजी पार्क परिसरात मुंबई युवक काँग्रेस आणि प्राणीमित्र संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्त्वाखाली मुंबई युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि प्राणीमित्र संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आज शिवाजी पार्क परिसरात भटक्या कुत्र्यांविरोधात सुरु असलेल्या कारवाईचा निषेध केला. यावेळी बोलताना झीनत शबरीन म्हणाल्या की भटक्या प्राण्यांना स्वतःसाठी आवाज उठवता येत नाही. त्यांच्याशी क्रूरता करणे योग्य नाही. जबाबदार नागरिक म्हणून मानवता, करुणा आणि न्याय या मूल्यांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. भटक्या कुत्र्यांना हटवण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा आधार घेत मुंबईत कारवाई सुरू झाली आहे; परंतु हा आदेश अत्यंत व्यापक असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी योग्य यंत्रणा, शेल्टर, वैद्यकीय सुविधा आणि ABC (Animal Birth Control) निर्माण केली पाहिजे. पण पर्यायी व्यवस्था उभी न करता कारवाई करणे अमानवी, अव्यवहार्य आणि अन्यायकारक आहे.




राहुल गांधी यांनी वोटचोरीचा मुद्दा मांडला की लगेचच अशा कारवाया करून महत्वाच्या मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न सुरु होतो. जसे दादरमध्ये कबूतर खाण्याच्या विषयावर पर्यायी व्यवस्था शोधण्यात आली, तसेच भटक्या कुत्र्यांसाठीही सरकारने पर्याय उपलब्ध करणे आवश्यकच आहे. हे प्राणीही या शहराचा एक भाग आहेत; त्यांनाही जगण्याचा अधिकार आहे. मुंबई युवक काँग्रेस प्राणीप्रेमी, प्राण्यांच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्या संघटना आणि संवेदनशील मुंबईकरांच्या पाठीशी ठाम उभी आहे असे शबरीन म्हणाल्या.

# ट्रान्सजेंडर समुदायासाठी 3-दिवसीय पीएलव्ही प्रशिक्षणाचा यशस्वी समारोप

## अमली पदार्थांचा धोका व डिजिटल व्यसनावर मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/प्रतिनिधी :** ट्रान्सजेंडर समुदायाच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण (डीएलएसए), मुंबई यांच्या वतीने आयोजित तीन दिवसीय पीएलव्ही (पॅरालीगल व्हॉलंटियर) प्रशिक्षणाचा यशस्वी समारोप शनिवार, १५ नोव्हेंबर रोजी झाला. हमसफर ट्रस्ट, वाकोला, सांताक्रूझ पूर्व येथे हे विशेष प्रशिक्षण श्रीमती मनीषा चव्हाण (डीएलएसए) यांच्या समन्वयाने पार पडले. या सत्रात अमली पदार्थांच्या गैरवापराचा धोका, डिजिटल व्यसन आणि जीवन कौशल्ये यावर प्रबोधन




करण्यात आले, ज्यामुळे सहभागींना व्यसनमुक्त आणि सक्षम जीवन जगण्याचे मार्गदर्शन मिळाले.नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्यचे कार्यकारी समिती सदस्य आणि राष्ट्रीय प्रशिक्षक श्री. बॉस्को डिसूझा आणि श्री. विवेक साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. प्रत्येक टप्प्यात पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन (पीपीटी) आणि अत्यंत संवादात्मक पद्धती अवलंबून सत्रे घेण्यात आली. सहभागींनी सक्रियपणे भाग घेतला असून, सत्राचा शेवट प्रश्नोत्तर सत्राने झाला, ज्यात सहभागींनी




त्यांच्या शंकांचे निरसन केले. या प्रशिक्षणामुळे ट्रान्सजेंडर समुदायातील पॅरालीगल स्वयंसेवकांना कायदेशीर जागरूकता आणि सामाजिक कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल, असे आयोजकांनी सांगितले.हमसफर ट्रस्टच्या टीमने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. आयोजक सुधांशू .एल (वकिली व्यवस्थापक), निलोफर एम (वरिष्ठ वकिली अधिकारी) आणि त्यांच्या टीममधील आशु गोयल, डॅनियल भटिजा आणि विवेक पी (एम अँड ई अधिकारी) यांनी उत्कृष्ट समन्वय साधला. या उपक्रमामुळे ट्रान्सजेंडर समुदायातील तरुणांना व्यसनाच्या जाळ्यातून मुक्त होण्यासाठी आणि डिजिटल जगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक उपकरणे मिळाली.डीएलएसए आणि हमसफर ट्रस्ट यांच्या संयुक्त प्रयत्नाने अशा उपक्रम सुरूच राहणार आहेत, जेणेकरून अल्पसंख्याक समुदायांना न्यायपूर्ण आणि सुरक्षित वातावरण मिळेल. अधिक माहितीसाठी हमसफर ट्रस्टशी संपर्क साधावा.

# सिंगद येथे क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी / राजु गायकवाड** : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारक आणि आदिवासी समाजाचे दैवत क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची जयंती (१५ नोव्हेंबर) सिंगद अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. विविध सामाजिक आणि विशेषतः आदिवासी बांधवांनी एकत्र येऊन 'भगवान बिरसा मुंडा' यांच्या कार्याचे स्मरण केले आणि त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.भव्य मिरवणूक आणि गौरवगान यंदाच्या जयंती सोहळ्याचे मुख्य आकर्षण गावाच्या मध्यभागातून काढण्यात आलेली भव्य मिरवणूक होती. पारंपारिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि बिरसा मुंडा यांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. अनेक तरुणांनी




आपल्या हातात बिरसा मुंडा यांचे चित्र असलेले फलक घेतले होते. या मिरवणुकीत स्थानिक लोकप्रतिनिधी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.महत्वाचे "बिरसा मुंडा यांनी जल, जंगल आणि जमीन यावर आदिवासी समाजाचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी इंग्रजांविरुद्ध तीव्र संघर्ष केला. त्यांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण देशासाठी प्रेरणास्रोत आहे." - असे मत प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले. आयोजित मुख्य समारंभात अनेक मान्यवरांनी बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. 'उलगुलान' (महान विद्रोह) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या

> आदिवासी समाजाचा न्यायासाठी सुरु असलेला संघर्ष आज स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षांनंतर ही सुरुच आहे.या संघर्षाचे उत्तर केवळ संविधानातून मिळू शकते. आदिवासी तरुणांनानी शिक्षण,सामाजिक चळवळ राजकारण आणि नोकऱ्यामध्ये उतरून आधुनिक उलगुलान करणे ही काळाची गरज आहे. आज आदिवासी समाज, संस्कृती सोबतच आरक्षणाचे रक्षण करण्याचे आव्हान सुद्धा समाजापुढे असून बिरसा मुंडाच्या आयुष्यापासून प्रेरणा घेऊन लढा उभारयला हवा.तरुणांनी अंधश्रद्धा, अशिक्षितपणा आणि व्यसनाधीनतेला सोडून विज्ञानवादी विचारांची कास धरायला हवी.
>
> प्रशांत खंदारे
> -छात्र भारती जिल्हाध्यक्ष.

त्यांच्या क्रांतीमुळे आदिवासी समाजात आत्मसन्मानाची आणि लढण्याची भावना निर्माण झाली, असे वक्त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती किसन डफडे, राजु गायकवाड, सिद्धार्थ कांबळे,आणि विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते यावेळी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अश्विन माघाडे, सुरेश होलगरे, अविनाश वाघमारे, गजानन होलगरे, नामदेव भोगे, संजय पवणे, विकी ढोके, रोशन खटारे, राजेश खटारे, गोपाल झळके, स्वप्नील खटारे, लखन भोगे, प्रणव खटारे,गणेश शिकारे संदीप ससाने,राहुल होलगरे यांनी अथक परिश्रम घेतले.

# मार्लेगाव पंचायत समिती सर्कलसाठी शुभम कळलावे यांची दोन्ही आघाड्यांकडे तिकीटाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

पंचायत समिती निवडणुकांच्या तयारीला वेग येत असताना मार्लेगाव सर्कलमध्ये नवीन राजकीय हालचाली पाहायला मिळत आहेत. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय असलेले तरुण कार्यकर्ते शुभम कळलावे यांनी महाविकास आघाडी तसेच महायुती या दोन्ही आघाड्यांच्या घटक पक्षांकडे तिकीट मागणी केल्याने स्थानिक राजकारणात नवा रंग चढला आहे.

कळलावे यांनी गेल्या काही वर्षांत ग्रामपातळीवर शैक्षणिक उपक्रम, शिक्षक प्रशिक्षण, महिला सक्षमीकरण, ग्रामविकास योजनांचे मार्गदर्शन आणि सामाजिक बांधिलकी अशा विविध क्षेत्रांमध्ये सातत्याने काम केले आहे. यामुळे स्थानिक पातळीवर त्यांना तरुण, कार्यक्षम आणि विश्वासार्ह नेतृत्व म्हणून ओळख मिळाल्याचे नागरिकांचे मत आहे.तिकीट मागणीबाबत बोलताना शुभम कळलावे म्हणाले,"मार्लेगाव सर्कलचा विकास, शिक्षणाची गुणवत्ता, ग्रामीण भागातील सुविधा आणि युवकांना संधी या मुद्द्यांवर मी सतत काम करत आलो आहे. जनतेचा पाठिंबा आणि स्थानिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन मी दोन्ही आघाड्यांच्या घटक पक्षांकडे तिकीटाची मागणी केली आहे."कळलावे यांच्या सक्रियतेमुळे दोन्ही आघाड्यांतील स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. युवक नेतृत्वाला संधी देण्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या नावाला दोन्ही गटांकडून



प्रतिसाद मिळू शकतो, अशी शक्यता राजकीय विश्लेषक व्यक्त करतात. निवडणूक समीकरणे आणि स्थानिक लोकप्रियतेच्या दृष्टीने त्यांच्या नावाचा विचार होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.दरम्यान, दोन्ही आघाड्यांतील जिल्हास्तरीय नेत्यांच्या बैठकीनंतरच अंतिम उमेदवारीची प्रक्रिया सुरू होणार असून, कळलावे यांच्या मागणीवर कोण बाजू सकारात्मक निर्णय घेणार याकडे मार्लेगाव सर्कलच्या मतदारांचे लक्ष लागले आहे.

# छाननीच्या वेळी उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कागदपत्रासह उपस्थित रहावे

## निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचे आव्हान

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हाप्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**रिसोड :** नगरपरिषद निवडणूक अर्ज सादर करण्याच्या अंतिम मुदतीनंतर 18 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या छाननीच्या वेळी उमेदवाराने कोणती कागदपत्र दस्तऐवजासह उपस्थित रहावे? याबाबत निवडणूक आयोगाकडून काही सूचना उमेदवारांना देण्यात आले आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी दिली आहे. नामनिर्देशांना विरुद्धच्या संभाव अक्षय 50 उत्तर देण्यासाठी उमेदवाराने छाननीच्या वेळी आपल्या सोबत सर्वसाधारणपणे खाली कागदपत्रे ठेवणे योग्य होईल अद्यावत मतदार यादीच्या संबंधित भागाची प्रत किंवा उमेदवार व सुचक यांचे नाव असलेल्या प्रभागांच्या/मतदार संघाच्या अद्यावत मतदार यादीतील नोंदीची प्रमाणित प्रत, व यासंबंधी समाधान पुरावा, अनामत रक्कम भरण्याची पावती किंवा चलनाची प्रत, नाम निर्देशन पत्राची

> 18 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अर्जाच्या छाननी संदर्भात निवडणूक आयोगाने ज्या मूळ दस्तऐवजासह उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे उमेदवारांनी ते सोबत आणावे. छाननी साठी येत असताना सर्व दस्तावेजांची तपासणी आवश्यक करून घ्यावी
>
> -प्रतीक्षा तेजनकर,
> निवडणूक निर्णय अधिकारी रिसोड

> 17 नोव्हेंबर रोजी सर्व अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असून 18 नोव्हेंबर रोजी अर्जाची छाननी होणार आहे. सदर अर्जाने छानिनी ही प्रभाग निहाय होणार असून उमेदवारांनी वेळेत हजर राहणे बंधनकारक आहे उमेदवारांनी सोबत आणलेले दस्तावे योग्यरीत्या क्रमांका नुसार घेऊन यावे.
>
> -सतीश शेवदा,
> सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी

पोच आणि छाननीची सूचना, अपराध सिद्धीच्या तपशीला संबंधात आणि अपत्य संबंधात विहित नमुन्यांमध्ये दाखल केलेल्या प्रतिज्ञा पत्राची प्रत, नामनिर्देशना विरुद्ध जो संभाव्य क्षेप घेण्यात येईल अशा आक्षेपांचे खंडन करण्यासाठी आवश्यक असे असा इतर कोणताही पुरावा किंवा साहित्य, जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राच्या मूळ प्रति, या कागदपत्रासह छाननीचे वेळी नगरपरिषद कार्यालय सभागृहामध्ये उपस्थित राहावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले आहे.

# शालेय सहलीसाठी 'एसटीच्या ' नवीन बसेस - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** स्वस्त आणि सुरक्षित ' प्रवासाचा आनंद घेण्यासाठी यंदा शाळा - महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळ नवीन बसेस उपलब्ध करून देणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे दिवाळी सुट्टी संपली की, शाळेच्या विद्यार्थ्यांना विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी सहलीचे वेध लागतात. शालेय सहली हा विद्यार्थी जीवनातील अतिशय संस्मरणीय असा अनुभव असतो. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय सहलीसाठी त्यांच्या




एकूण भाड्यामध्ये ५०% टक्के सवलत देते. त्यामुळे अतिशय मापक दरामध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देणे शक्य होते. तो त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील एक उपक्रम असतो.

अर्थात, यंदा एसटीकडे असलेल्या नवीन बसेस या शालेय सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्यभरात असल्या एसटीच्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते १००० बसेस विविध शाळा-महाविद्यालयांना सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले

मागील वर्षी शालेय सहलीसाठी १९६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या. मागील वर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान राज्यभरातील विविध शाळा- महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाने तब्बल १९६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या माध्यमातून एसटीला तब्बल ९२ कोटी रुपयांचा (प्रतिपुर्ती रक्कमेसह ) महसूल प्राप्त झाला होता. यंदा देखील प्रत्येक आगारातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा-महाविद्यालयांना दररोज एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात बाबत आवाहन करण्यात येत आहे. आगारप्रमुख, स्थानकप्रमुख स्वतः शाळा -महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना भेटून विविध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या सहलीचे आयोजन करण्यासाठी आवाहन करीत आहेत.

# सक्षमीकरणाची चळवळ;आंबेडकरी स्त्री संघटनेची 'संविधान महोत्सव जागृती परिषद' २५ नोव्हेंबरला दादरमध्ये !

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( प्रतिनिधी ) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीस ७५ वर्षे पूर्ण होत असताना, आंबेडकरी विचारांच्या महिलांसाठी एक विशेष व्यासपीठ निर्माण करणारी 'आंबेडकरी स्त्री संघटन' राज्यपातळीवर पहिली मोठी परिषद आयोजित करत आहे. 'संविधान महोत्सव जागृती परिषद' या नावाने ओळखली जाणारी ही परिषद २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आंबेडकर भवन, दादर, मुंबई येथे होणार आहे. या उपक्रमातून आंबेडकरी महिलांच्या स्वतंत्र समस्या आणि गरजा मांडताना, बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर तत्वज्ञानाच्या आधारे त्यांच्यातील आत्मसन्मानाची जाणीव जागवली जाणार आहे.

गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत असलेल्या या संघटनेने मुंबईत १५ हून अधिक कार्यक्रम राबवले आहेत. विविध सामाजिक-राजकीय संघटनांमध्ये सक्रिय असलेल्या आंबेडकरी महिलांना एकत्र बांधण्यासाठी हा सामायिक व्यासपीठ तयार केले गेले आहे. संघटनेच्या सुकाणू कमिटीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, "जातीव्यवस्था आणि पुरुषप्रधान व्यवस्थेच्या दोन पेचात सापडलेल्या आंबेडकरी महिलांच्या स्वतंत्र प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आम्ही हे काम हाती घेतले आहे. आपल्या बंधूंसोबत काम करतानाही 'स्त्री' म्हणून आपल्या गरजा मांडणे आवश्यक आहे." या निवेदनातून स्पष्ट केले आहे की, संघटनेचा उद्देश महिलांचा सहभाग कायम ठेवताना त्यांना 'व्यक्ती' म्हणून ओळख मिळवून देणे हा आहे.

परिषदेच्या उद्घाटक म्हणून आंबेडकरी विचारांचे अभिनेते मिलिंद शिंदे उपस्थित राहणार असून, प्रमुख वक्ते म्हणून लेखक, विचारवंत प्रा. राम पुनियानी आणि अध्यक्षपद लेखिका, कवियत्री डॉ. प्रज्ञा दया पवार भूषविणार आहेत. संविधानाच्या ७५ वर्षांच्या वाटचालीवर चर्चा, जागृती सत्रे आणि महिलांच्या भूमिकेवर केंद्रित चर्चासत्रे या परिषदेचा भाग असतील. या उपक्रमातून राज्यभरातील आंबेडकरी महिलांना एकत्र येण्याची संधी मिळेल, ज्यामुळे पुढील काळात मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम राबवता येतील.

संघटनेच्या संस्थापक प्रा. आशालता कांबळे म्हणाल्या, "आंबेडकरी चळवळीत महिलांचा सहभाग मोठा आहे, पण त्यांच्या स्वतंत्र आवाजाला दाबले जाते. ही परिषद त्यांना सक्षम करण्यासाठी पाऊल आहे. आपल्या बंधूंना सोबत घेऊन आम्ही हे यशस्वी करू." संघटनेच्या सुकाणू समितीत नंदाताई कांबळे, पुष्पा धाकतोडे, शिरीन लोखंडे, डॉ. श्यामल गरुड, छाया खोब्रागडे, प्रा.डॉ. निशा शेंडे, शारदा नवले, छाया कोरेगावकर, माधुरी शिंदे, मयुरा सावी, सुरेखा पैठणे आणि वैभवी अडसूळ यांचा समावेश आहे.

या परिषदेसाठी उत्साही प्रतिसाद मिळत असून, आंबेडकरी विचारांच्या मैत्रिणींनी आणि मित्रांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रा.आशालता कांबळे ९९३०३७३०५३ आणि नंदाताई कांबळे ९८२०८०१८४५ यांच्याशी संपर्क साधावा. ही परिषद केवळ जागृतीच नव्हे, तर आंबेडकरी महिलांच्या सक्षमीकरणाची नवी सुरुवात ठरेल, अशी अपेक्षा आहे.

# सचिन तेंडुलकर यांना भेटण्यासाठी २२ वर्षापासुन जोपासला अनोखा छंद



**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचे चाहते सुधीर रामनाथ दरेकर राहणार घुलेवाडी तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) यांनी एक आगळा वेगळा छंद जोपासला आहे.वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले सचिन तेंडुलकर यांचे छायाचित्रे, लेख ,माहिती इ.सन १९९९ पासून २०२२ पर्यंत जमा करून ठेवली आहे. हा संग्रह खूप मोठा आहे त्या सर्व फोटो कात्रण एकत्र चीटकुन त्याचे जवळपास २५ पुस्तके बनवले आहे. प्रत्येक पुस्तकात १०० पाने आहेत.सचिन तेंडुलकर यांना भेटून हा उपक्रम दाखवता यावे याठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मागील २२ वर्षापासून पेपर मधील सचिन तेंडुलकर यांचे कात्रण जमा केले ते कात्रण सचिन तेंडुलकर यांची भेट घेऊन हा संग्रह तेंडुलकर यांना दाखवण्याची सुधीर दरेकर यांची इच्छा आहे.

> कोणी मदत करले का ?
> मी मागील २२ वर्षांपासून वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे छायाचित्रे,लेख, माहिती यांचे कात्रण जमा करून १०० पानी २५ पुस्तकांचे संग्रह तयार केले असून हे तेंडुलकर यांची भेट घेऊन त्यांना दाखवायचे आहे. परंतु आजपर्यंत भेट घडून आलेली नाही. तरी भेट घडवून आणण्यासाठी मला मदत करा.आर्थिक मदतीची आवश्यकता नाही. फक्त भेटण्यासाठी संपर्क करून द्यावा हिच विनंती.
>
> सुधीर रामनाथ दरेकर
> संपर्क क्रमांक ९९६०७४६५८९

# लोहा कंधार विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षप्रवेश संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड -** भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष शरद पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णासाहेब पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाऊराव कंधारे, भारतीय जनता पार्टीच्या सविताताई सातेगाव, माजी सभापती पंकज परिहार, शेषराव तेलंग, राहुल बोरगावकर, गजानन उत्तरवार, माधवराव आन्नकाडे, वजीर कुरेशी, रमजान कुरेशी यांच्या सह अनेक जणांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये प्रवेश केला आहे.

आपला पक्ष शिव शाहू फुले आंबेडकरांच्या विचारधारेवर चालत होता आजही त्याच विचारधारेने चालतो आहे आणि पुढेही चालत राहणार आहे.

आपण प्रत्येक जाती धर्मांना सोबत घेऊन चालणार आहोत सर्वधर्मसमभाव हीच आपल्या समाजकारणाची ओळख आहे.

आजच्या पक्षप्रवेशामुळे लोहा शहरात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद नक्कीच वाढली असून येत्या काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्याचं यश दिसून येईल असा विश्वास व्यक्त केला.

तसेच येत्या काळात सर्वांनी एकजुटीने आणि जबाबदारीने पक्षाची विकासाभिमुख विचारधारा घरोघरी पोहोचवण्यासाठी आणि पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहनही केले.यावेळी माजी आमदार मोहनराव हंबर्डे, दिलीपराव धर्माधिकारी, ॲड. मुक्तेश्वरभाऊ धोंडगे, प्रवीण पाटील चिखलीकर, उदयराव चव्हाण, सचिन पाटील चिखलीकर, माणिकराव मुकदम, किरण सावकार वट्टमवार, केशवराव मुकदम, नामदेवराव पवार, दत्तात्रय वाले, केशवराव मुकदम, रावसाहेब इंगोले, दीपक कानवटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्हाईस ऑफ मीडिया चे तालुका अध्यक्ष इलियास बावाणी यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूर :(प्रतिनिधी) सय्यद ईसा**



जेष्ठ पत्रकार ईलीयास बावाणी, यांची व्हाइस ऑफ मीडिया तालुका माहुर घ्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली त्याबद्दल, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी,मित्र परिवारातर्फे दि 15 नोव्हेंबर 2025 रोजी तहसिल कार्यालयासमोरील विजय टि सेंटर येथे सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या नेतृत्वाखाली चार लाख सत्तर हजार सदस्यसंख्या असलेली व्हाईस ऑफ मीडिया हि देशातील सर्वात मोठी पत्रकारांची संघटना असुन 56 देशांमध्ये कार्यरत आहे .या संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेशराव जोशी यांनी तालुका अध्यक्ष विजय आमले यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती केल्यामुळे तालुका अध्यक्षपद रिक्त झाले होते.त्या रिक्त पदांवर माहुर शहरातील जेष्ठ पत्रकार इलियास बावाणी यांची तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.त्याबद्दल शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी मित्र परिवारातर्फे त्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या कार्यक्रमात माहूरचे नूतन पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचा सुध्दा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. चोपडे यांनी माहूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने सकारात्मक काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांचा सन्मान करताना उपस्थितांनी स्थानिक प्रशासनाबद्दल विश्वास व्यक्त केला.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे तालुका अध्यक्ष राठोड यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थित नियोजन मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी केले होते.

> राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जी काळे, प्रदेश अध्यक्ष अनिल जी मस्के जिल्हाध्यक्ष गणेश जोशी यांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही,संघटणेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देणार तसेच संघटणा वाढीसाठी सदैव प्रयत्न करणार.
>
> इलियास बावाणी अध्यक्ष
> व्हाईस ऑफ मीडिया माहुर तालुका

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार नंदू संतान हे होते तर प्रमुख उपस्थितात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उबाठा ज्योतिबा दादा खराटे माजी जि प सदस्य संजय राठोड इंजिनीयर विजय जाधव काँग्रेसचे किसन राठोड भाजपचे तालुका अध्यक्ष निळकंठ मस्के शिवसेना उबाठा चे तालुका अध्यक्ष जितू चोले भाजपाचे अनिल वाघमारे पत्रकार नंदकुमार जोशी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष विजय राठोड सदाशिव राठोड नामदेव राठोड बालाजी जाधव संजय राठोड बालाजी जाधव शिवचरण राठोड इर्शाद भाई मकरानी राजूभाऊ राठोड सरपंच आकाश राठोड फय्याज फारुकी आकाश धूर्वे डि के जोशी यांचे सह कार्यक्रमाचे आयोजक विनोद पाटील सूर्यवंशी विजय कांबळे बालाजी गेंटलवार देविदास वानखेडे दीपक कांबळे आनंदा मरवाळे महाराज पिंटू गादेवार विशाल खरे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी आयोजकांचे व सत्कारमूर्तींचे अभिनंदन करत कार्यक्रमाला यशस्वीपणे पूर्णत्वास नेले.

# पिंपळगाव बसवंत नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल

## विकासाभिमुख नेतृत्वाकडून पुढील वाटचालीचे संकेत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

**पिंपळगाव बसवंत :** येथील नगरपरिषद पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली. स्थानिक नेतृत्वात आपल्या कार्यपद्धतीमुळे ओळख निर्माण केलेले माजी सरपंच भास्करराव (नाना) बनकर यांनी उमेदवारीचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शशिकांत मंगरूळे व सहाय्यक निर्णय अधिकारी श्रिया देवचक्के यांच्या समक्ष विधिवत दाखल केला.

अर्ज दाखल प्रक्रियेच्या वेळी विविध सामाजिक, राजकीय आणि ग्रामविकास कार्यात सक्रिय असलेल्या पदाधिकारी व समर्थकांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. या प्रसंगी युवा नेते गणेश बनकर, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खोडे, सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत बनकर, जितेंद्र



मुथा, दिलीप देशमाने यांसह अनेक कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवून आपला सहभाग नोंदवला.

गेल्या काही वर्षांपासून पिंपळगाव बसवंत येथे मूलभूत सुविधा, स्वच्छता, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा, युवकाभिमुख उपक्रम आणि सामुदायिक विकास यांसंबंधी विविध योजना राबविण्याचा प्रयत्न झाल्याचे नागरिकांकडून सूचित केले जाते. आगामी काळात नगर विकासात सातत्य, उत्तरदायित्व आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनाबाबत स्थानिक स्तरावर अपेक्षा व्यक्त होत आहेत.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसमोर नगरपरिषदेचा भावी विकास आराखडा, प्राधान्यक्रम, वेगवान सेवा यंत्रणा आणि गुणात्मक सुविधांचा मुद्दा केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे. शहराच्या भावी प्रगतीसाठी सुशासन, पारदर्शकता आणि विकासाभिमुख दृष्टीकोनाची अपेक्षा असल्याचे पाहायला मिळत आहे.नगरपरिषद निवडणुकांकडे सर्वांचेच लक्ष लागले असून पिंपळगाव बसवंतच्या विकास प्रवासातील आगामी अध्याय कोणत्या नेतृत्वाखाली साकारतो, याबाबत उत्सुकता वाढली आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया उत्साहात पार पडली असून निवडणूक लढतीच्या पुढील टप्प्यांकडे सर्वांचे लक्ष वेधले जात आहे.

# धानोरा महाविद्यालयाचे प्रा निसार शेख महाराष्ट्र गौरव 'आदर्श शिक्षक' राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

## सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ राठोड यांच्या हस्ते झाला सन्मान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील सर्व सामान्य कुटुंबात जन्मलेल्या प्रा निसार शेख यांना शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त ‘लोकशक्ती महाराष्ट्र गौरव 'आदर्श शिक्षक' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित आले. सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ दत्ताराव राठोड, ‘गावरान मस्ती’ फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, 'झुंजार नेता'चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा निसार शेख हे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा




येथे गेली २५ वर्षापासून प्राध्यापक म्हणून न्यायदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. शिक्षण क्षेत्रा बरोबरच ते पत्रकार म्हणून ही उत्कृष्ठ कार्य करीत आहेत.

शैक्षणीक व पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत असल्याने त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

प्रा निसार शेख यांनी गेली २५ वर्षात हजारो विद्यार्थी घडविले आहे. आज त्यांचे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी विविध क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी अहील्यानगर येथील हॉटेल यशग्रँड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा निसार शेख यांचे माजी आमदार भिमरावजी धोंडे, प्रशासन अधिकारी शिवदास विधाते, डी बी राऊत, माऊली बोडखे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले, प्राचार्य भगवान वाघुले, उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे, पत्रकार अविनाश कदम, अक्षय विधाते, मुख्याध्यापक तथा पत्रकार जावेद शेख, सामाजिक कार्यकर्ते समीर शेख, संतोष नागरगोजे, गनिभाई तांबोळी, निसारभाई कुरेशी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# काशीद ग्रामपंचायतीत जिल्हाधिकाऱ्यांची मोठी कारवाई सरपंच, उपसरपंच व सदस्य यांचे सदस्यत्व रद्द

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा :**

मुरूड तालुक्यातील काशीद ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार व बेकायदेशीर कृत्यांवर जिल्हाधिकारी रायगड यांनी धडाकेबाज कारवाई करत सरपंच संतोष राणे, उपसरपंच सुमित रमेश कासार आणि सदस्य दीपेश दत्तात्रेय काते यांची पदे तात्काळ रद्द केली आहेत. या तिन्ही पदाधिकाऱ्यांवर शासकीय जागेवरील अतिक्रमण, बेकायदेशीर बांधकाम, दस्तऐवजांचा गैरवापर, आणि शासन मालकीची जमीन खोट्या नोटरी करून विक्री केल्यासारख्या गंभीर आरोपांची सुनावणी झाली होती. सामाजिक कार्यकर्ते ॲड. रोहन रमण खोपकर यांच्या अधिवेशनानंतर आणि पुराव्यांच्या आधारे ही कारवाई झाली. सरपंचाने शासन मालकीची जमीन विक्री करताना नोटरीवर १२ लाखाचा गैरहिशोब केला, उपसरपंचाने समुद्रकिनाऱ्यावर अनधिकृत स्टॉल उभारला, तर सदस्याने सरकारी जागेवर आईच्या नावाने बांधकाम केले होते. २०२३



डिसेंबर व ४ एप्रिल २०२४ रोजी दाखल तक्रारीच्या सुनावणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व पक्षांचा विचार करून ठोस निर्णय घेतला.या आदेशामुळे काशीद परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयात अंतिम सुनावणीदरम्यान ॲड. परेश देशमुख यांनी सर्व पुरावे मांडले होते. या निर्णयाने स्थानिक प्रशासन आणि नागरिकांमध्ये न्यायालयीन प्रक्रियेला नवसंजीवनी मिळाली आहे.याच कारवाईचा परिणाम म्हणून रेवदंडा समुद्र किनारी तसेच परिसरातील अनधिकृत बिल्डिंग, रिसोर्ट्स बांधणाऱ्यांनाही धडा बसला आहे. वाढत्या जनतेच्या दबावामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य सचिव राजेंद्र कुमार यांनी प्रत्यक्ष हस्तक्षेप करून किनारपट्टीवरील अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता परिसरभर जोर धरू लागली आहे.

# “बेलापूर न्यायालयात प्रतिध्वनीत झाला बालहक्कांचा आवाज

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

**बेलापूर, नवी मुंबई :** बालदिवसाच्या निमित्ताने दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे समाजप्रबोधनासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, तालुका विधी सेवा समिती, बेलापूर, नवी मुंबई वकील संघटना आणि टिळक महाराष्ट्र विधी विद्यालय, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘बालकांचे हक्क’ या विषयावर ‘थोडा पॉज’ या पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.या उपक्रमाची संकल्पना कौटुंबिक न्यायालयाचे माननीय न्यायाधीश श्री. सुभाष काफरे यांची होती.नवरा–बायकोच्या कौटुंबिक वादांचा निर्दोष मुलांवर होणारा मानसिक परिणाम, तसेच अनेकदा मुलांचा वादात ‘हत्यार’ म्हणून होणारा गैरवापर या गंभीर सामाजिक विषयावर प्रकाश टाकणारे हे पथनाट्य टिळक विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. प्राध्यापिका वर्षा बडवे आणि सहायक प्राध्यापिका प्राजक्ता बालवीर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या या नाट्यातून कौटुंबिक सौहार्दाचे महत्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.दांपत्यातील सततच्या भांडणांमुळे मुलांच्या मनावर ताण, भीती, अभ्यासात ढासळणारी एकाग्रता आणि आत्मविश्वास कमी होण्याची समस्या वाढत आहे.अशा परिस्थितीत पालकांनी घटस्फोटाचा निर्णय घेण्यापूर्वी मुलांच्या भविष्यासाठी एकदा तरी विचार करावा, हा मोलाचा संदेश पथनाट्याद्वारे समाजास देण्यात आला.या कार्यक्रमात नवी मुंबई वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुनिल मोकल, उपाध्यक्ष ॲड. संदीप रामकर, सचिव ॲड. विकास म्हात्रे आणि कार्यकारिणी सदस्य यांच्या वतीने पथनाट्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. नाझनीन शेख यांनी केले.कार्यक्रमाला कौटुंबिक न्यायालयाचे विवाह समुपदेशक भारत काळे, प्रबंधक जी. एस. हिरवे, सहायक अधिक्षक राजेश म्हात्रे, लघुलेखक विजय पोटे आणि कुलदीप जाधव, वरिष्ठ लिपिक के. पी. किर्वे, कनिष्ठ लिपिक निलम भोसले, अक्षता कोळसुंदकर, सहाय्यक राज निकम, प्रीती






नन्नावरे, तसेच पोलीस कर्मचारी सुनिछ बातेरे आणि पल्लवी देशमुख यांच्यासह वकील, पक्षकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या पथनाट्यामुळे विवाहित दांपत्यांमधील तणाव कमी होण्यास, घटस्फोटाच्या वाढत्या संख्येत घट करण्यास आणि घरातील सौहार्द जपण्यासाठी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी मदत होईल, असे उपस्थितांनी व्यक्त केले.

एकंदरीत, ‘थोडा पॉज’ या पथनाट्याने समाजाला कौटुंबिक मूल्यांचा आणि मुलांच्या मानसिक आरोग्याचा अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला.

# शिक्षक अधिकारी स्पर्धा मध्ये शेंदुर्णीतील निकम दाम्पत्याचा नाशिक विभागावर डंका

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** शिक्षक अधिकारी स्पर्धा २०२५-२६ मध्ये शेंदुर्णी सेकंडरी एज्युकेशन सोसायटी लिमिटेडचे कर्मचारी असलेल्या प्रा. वर्षा अविनाश निकम आणि अविनाश वासंती आत्माराम निकम या निकम दाम्पत्याने शानदार कामगिरी करत नाशिक विभाग पातळीवर निवड मिळवली आहे.अ.र.भा. गरुड कनिष्ठ महाविद्यालय, शेंदुर्णी



येथील प्रा. वर्षा अविनाश निकम यांनी स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत उत्कृष्ट काव्य सादरीकरण करत विभागीय स्तरावर आपले स्थान पक्के केले आहे.तर अविनाश वासंती आत्माराम निकम (सहायक शिक्षक), अप्पासाहेब पी.एस.पाटील माध्यमिक विद्यालय,नांद्रे ता.पाचोरा यांनी बाल मानसशास्त्र–केस स्टडी या स्पर्धेत उल्लेखनीय सादरीकरण करीत विभागावर निवड मिळवली आहे. निकम दाम्पत्य जळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून स्वरचित कविता व बाल मानसशास्त्र या दोन भिन्न क्षेत्रांतून नाशिक विभागीय पातळीवर स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या यशाबद्दल डाएट प्राचार्य,मुख्याध्यापक,गट शिक्षण अधिकारी यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.तसेच संस्थेचे चेअरमन आदरणीय दादासाहेब संजयदादा गरूड,उपाध्यक्ष आबासाहेब भिमराव शेळके,सचिव काकासाहेब सागरमलजी जैन,सहसचिव दादासाहेब यू.यू. पाटील,कार्यालयीन सचिव भाऊसाहेब दीपक गरूड, वसतिगृह सचिव गो.गो.सूर्यवंशी, संचालक मंडळ, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधूभगिनींनी दाम्पत्याचे हार्दिक अभिनंदन केले.पंचक्रोशीत निकम दाम्पत्याच्या या दुहेरी यशाचे कौतुक होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## प्लास्टिक बंदी मोहिमेत जरंडी मध्ये दंडात्मक कारवाई: २० हजार ५०० दंड वसूल



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील जरंडी मध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जरंडी परिसरात प्लास्टिक बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.प्लास्टिकचा वापर व विक्री आढळून आल्याने संबंधित दुकानदारांना नोटिसा देऊन दंड वसूल करण्यात आला.अभियानादरम्यान एकूण ₹२०,५०० (वीस हजार पाचशे रुपये) इतका दंड वसूल करण्यात आला आहे. प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल, असे कर्तव्यदक्ष ग्रामसेवक सुनिल मगंळुरे यांनी सांगितले.

## "विद्यार्थ्यांच्या हृदयात कायमचे घर करणारे शिक्षक अनिल माळी सर यांचे दुःखद निधन"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड** : (पिंपळगाव बसवंत) कोकणगाव (ता. निफाड, जि. नाशिक) : कोकणगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीप्रिय, शिस्तप्रिय, मनमिळाऊ व कर्तव्यनिष्ठ शिक्षक अनिल माळी सर यांच्या अकस्मात निधनाची अत्यंत दुःखद घटना घडली आहे. काल रात्री हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे दुःखद निधन झाले असून त्यांच्या जाण्याने शिक्षण क्षेत्राला मोठी पोकळी निर्माण झाली आहे.माळी सर हे विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जात होते. शिस्त, मूल्याधिष्ठित शिक्षण, विद्यार्थ्यांवरील प्रेम आणि शैक्षणिक बांधिलकी यासाठी ते सदैव स्मरणात राहतील. त्यांच्या अचानक निधनाची बातमी मिळताच विद्यार्थी, पालक व



शिक्षक वर्गात शोककळा पसरली आहे.आज दुपारी २.०० वाजता शिरपूर (जि. धुळे) येथे त्यांच्या पार्थिव देहाचा अंत्यविधी करण्यात येणार असून अनेक माजी विद्यार्थी, सहकारी, ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

त्यांच्या जाण्याने एका आदर्श शिक्षकाचा, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा आणि संवेदनशील मार्गदर्शकाचा दुःखद अंत झाला आहे. अनिल माळी सरांना विनम्र व भावपूर्ण श्रद्धांजली

## बिरसा मुंडा यांच्या१५० व्या जयंती निमित्त अभिवादन विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख**

**नागपूर:** आदिवासी देवता भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने आदिवासी समाजातील लोकांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली. बिरसा मुंडा युवा दलाचे अध्यक्ष राहुल मडावी यांनी भगवान बिरसा मुंडा



यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

## वझर येथील दोन सख्या बहिणी संतोषी लवटे व सुष्मिता लवटे वैद्यकिय प्रवेशास पात्र

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे**

**देगलूर :** देगलूर तालुक्यातील मौजे वझर येथील शेतकरी पुत्र तेजेराव तुळशीराम लवटे यांच्या दोन्ही मुली कु.संतोषी तेजेराव लवटे व सुष्मिता तेजेराव लवटे या नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून या दोन्ही सख्या बहिणी वैद्यकिय प्रवेशास पात्र ठरले आहेत.

कु.सुष्मिता तेजेराव लवटे हि मालती मेडिकल कॉलेज अकोला तर संतोषी तेजेराव लवटे हि माय मर मेडिकल कॉलेज लातूर येथे



पुढील शिक्षणास पात्र ठरले असून या निवडीमुळे दोन्ही बहिणीवर हणेगाव परिसर व वझर परिसरातून आहेत.

# कोकण सुपुत्र मोहन ज.कदम यांची "कोकण रत्न पदवी"साठी निवड

### ▸▸ स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे यांनी केली अधिकृत घोषणा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर ) :** स्वतंत्र कोकण राज्य अभियानतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून कोकण रत्न पदवी पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे.यावर्षी ग्रामीण तसेच शहरी भागातील गरजू व्यक्ती, विद्यार्थी, रुग्णांना, दिव्यांग, जेष्ठ नागरिक यांना सातत्याने मदतीचा हात देत वैद्यकीय उपचारसाठी सहकार्य करणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुका मधील कासार कोळवण गावचे कोकण सुपुत्र मोहन जयराम कदम यांना " कोकण रत्न पदवी " जाहीर झाली असून या पदवी समारंभाचे आयोजन शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत मुंबई मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान शेजारी, मुंबई येथे करण्यात आले असून, तो समारंभ संस्थेचे संस्थापक संजय कोकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक सचिन कळझुनकर सर उपस्थित राहणार आहेत. तसेच या संस्थेचे मुंबई अध्यक्ष धनंजय कुवेसकर, खजिनदार राजेंद्र सुर्वे, नेते सुभाष राणे आणि सल्लागार दिलीप लाड हेसुद्धा या कार्यक्रमाला हजर राहणार आहेत.

शिवशक्ती उत्कर्ष मंडळाचे कासार कोळवणचे माजी पदाधिकारी व साई भक्त ज्यांनी मंडळाच्या उन्नती कामासोबत अनेक विविध संस्था मध्ये कार्यरत असून महान समाजकार्याचा वसा घेतला.ज्यांनी हेच काम आयुष्यभर गावात राहून गावासाठी केले असे त्यांचे वडीलांचा वारसा पुढे घेऊन जात आहेत.याची पोच पावती म्हणून आतापर्यंत त्यांना अनेक महत्वाच्या व मानाच्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. समाजात कुठल्याही फळाची अपेक्षा न करता निःस्वार्थी पणे काम करून सर्वांना बरोबर घेऊन जाणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांचे नाव आज प्रसिद्ध आहे. पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा असा लौकीक असलेले पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते श्री.मोहन जयराम कदम यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांना अनेकांनी लाख लाख शुभेच्छा दिल्या असून पुढील आयुष्य सुखाचे समृद्धीचे व भरभराटीचे जावो हिच , साई चरणी प्रार्थना केली आहे.मोहन कदम महाराष्ट्रात विविध संस्था, मंडळ, प्रतिष्ठान, समाज शाखा मध्ये कार्यरत आहेत. त्यांनी समाज प्रबोधन करत समाजातील ज्या आवश्यक नाहीत अशा काही अनिष्ठ प्रथा बंद करण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे.ज्याच्या पासून वेळ,पैसा वाचेल असे कार्य ते करत आहेत. लोकांना जेवढी मदत करता येईल तेवढी करायची आणि गरजेला घरच्या माणसासारखं धावायचं अशी ओळख मोहन कदम यांची आहे.त्यांना याकामी त्यांची पत्नी, मुले, भाऊ आणि मित्र परिवार यांचे विशेष सहकार्य लाभते. घरातून समाजसेवेचे मिळालेले बाळकडू आणि पत्नी, मुलांचे प्रेम या जोरावर मोहन कदम यशस्वी झाले आहेत.

श्री. मोहन जयराम कदम हे एक अष्टपैलू-व्यासंगी सामाजिक कार्यकर्ता आणि निस्पृह- सजग पत्रकार असे व्यक्तिमत्व आहे. त्यांना आजवर राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा,राष्ट्रीय ग्राउंड लीडरशीप आयकॉन पुरस्कार,कोकणदीप समाजरत्न पुरस्कार २०२५, एशियन टॅलेन्ट गोल्डन अवॉर्ड सोहळा. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज गौरव पुरस्कार,प्रेरणा फाउन्डेशन तर्फे महाराष्ट्र उत्कृष्ट समाजसेवक राज्यस्तरीय पुरस्कार २०२५, प्रेरणा फाउन्डेशन तर्फे राज्यस्तरीय माणुसकी रत्न पुरस्कार २०२५, इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन व अमरदीप फाउंडेशन तर्फे राज्यस्तरीय जनरत्न प्रतिक्षा भूषण पुरस्कार २०२४, धगधगती मुंबई पुरस्कार २०२३,कला साधना सोशल संस्था पुरुष उत्कृष्टता पुरस्कार २०२३,लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद राष्ट्रीय लोक कल्याणकारी सेवा रत्न पुरस्कार २०२३,कार्यदर्पण आणि इव्हेंट टी एम जी सहयोगी संस्थेतर्फे जनगौरव कार्य दर्पण आयकॉन पुरस्कार २०२२,आंतरराष्ट्रीय मानव हक्क सेवा परिषद व महाराष्ट्र न्यूज १८ 'भारत श्री' नॅशनल पुरस्कार २०२२,ऑल इंडिया अँटी करप्शन कमिटी (मुंबई सचिव )अखिल भारतीय पत्रकार हक्क समिती : मुंबई जिल्हा प्रतिनिधी, झुंझार केसरी : मुंबई प्रतिनिधी, माहिती अधिकार, पोलीस मित्र आणि पत्रकार संरक्षण सेना पदभार : मीडिया हेड,आंतरराष्ट्रीय मानव अधिकार राजदूत संघटना, ग्लोबल पीस कौन्शिल, भारतीय महाक्रांती सेना आणि यु .एन. न्यूज २४ संलग्न, बोला मुंबई : पत्रकार, कोकण दीप : उपसंपादक,महाराष्ट्र पत्रकार संघ : सदस्य, आदर्श महाराष्ट्र : पत्रकार,समाजसेवा रत्न पुरस्कार २०२२, ओम साई नाथ नाच मंडळ, अमरनाथतर्फे पुरस्कार, माझी वसुंधरा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन प्रमाणित प्रमाणपत्र,समाजभूषण पुरस्कार २०२२,महात्मा ज्योतिबा फुले बहूउद्देशिय सेवाभावी संस्था पुरस्कार,प्रेस इन्फॉरमेशन ब्र्यु कोविड योद्धा सन्मान पत्र,जनशक्तीचा दबाव सन्मान पत्र, पोलीस तपास कोविड योद्धा पुरस्कार,स्वयंभू मार्लेश्वर प्रतिष्ठान कोविड योद्धा पुरस्कार, सत्यवादी मानवी मूल्य हक्क जोपासणारी संघटना सन्मान पत्र २०२०, भारतीय महाक्रांती सेना कोविड योद्धा पुरस्कार २०२०, आदर्श वार्ताहर कोविड योद्धा पुरस्कार २०२०, वर्ड हेल्थ ऑर्गनायझेशन करोना योद्धा पुरस्कार २०२०,भारत अस्मिता राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०१९, महाराष्ट्र सन्मान पुरस्कार, शिर्डी २०१९,महाराष्ट्र हरितसेना (महाराष्ट्र शासन) सदस्य,नॅशनल पुरस्कार २०१९,इंडियन आयकॉन अवॉर्ड २०१९,संत गाडगे महाराज समाज भूषण पुरस्कार २०१९, सह्याद्री कुणबी संघ, पुणे शहर तर्फे महाराष्ट्र गौरव पुरस्कार पुणे २०१९,छत्रपती संभाजी राजे कर्तव्य गौरव पुरस्कार २०१८, मानवी हक्क राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता, महाराष्ट्र शासन प्रमाणपत्र २०१८, राष्ट्रपिता महात्मा गांधी शांतिदुत पुरस्कार २०१८, नेताजी सुभाषचंद्र बोस भारत सन्मान पुरस्कार २०१८,कोकण रत्न पुरस्कार २०१८,महाराष्ट्र भूषण रत्न पुरस्कार २०१५ असे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

मोहन कदम यांना समाजसेवेचा वसा आजोबा, वडिलोपार्जित मिळाला आहे. लहानापासून आवड निर्माण झाली म्हणून जनसेवा ही ईश्वर सेवा असे समजून मी सतत काम करत असतो.लोकांचे आशीर्वाद हेच आमच्या साठी पुरस्कार आहेत असं मत मोहन कदम यांनी बोलताना व्यक्त केले. स्वतंत्र कोकण राज्य अभियानाचे संस्थापक संजय कोकरे,कोकण पदाधिकारी, सदस्य, सभासद व त्यांच्या निवड समितीचे आणि त्यांच्या टीम वर्क ने माझी निवड केली म्हणून त्यांचे मनापासून हार्दिक हार्दिक आभार व्यक्त केले.रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील कासार कोळवण गावचे सुपुत्र मोहन कदम यांना "कोकण रत्न पदवी" जाहीर झाल्याबद्दल साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर, पत्रकार, वृत्तपत्र लेखक,ग्रामीण मंडळ, विविध संस्था,प्रतिष्ठान पदाधिकारी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

हरी ओम रेल्वे प्रवाशी भजन मंडळाचे सल्लागार म्हणून गेली अनेक वर्षे निःस्वार्थ सेवा देणारे, सतत समाजकार्य आणि पत्रकारितेत सक्रिय राहून समाजाच्या प्रत्येक घटकाला दिशा देणारे, मान. श्री.मोहन जयराम कदम यांना त्यांच्या कार्याची दखल म्हणून "कोकण रत्न पदवी" या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे ही आपल्यासाठी, आपल्या मंडळासाठी आणि संपूर्ण कोकणासाठी अभिमानाची बाब आहे.त्यांचे कार्य केवळ शब्दांत मावणारं नाही पत्रकारितेतून समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, सामाजिक कार्यातून दुर्बल घटकांना आधार देणे, आणि धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यातून एकात्मतेचा संदेश देणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले आहे.

हरी ओम रेल्वे प्रवाशी भजन मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत त्यांनी अनेक भक्तिमय उपक्रमांना प्रोत्साहन दिले, मार्गदर्शन केले आणि प्रत्येक वेळी आपल्या उपस्थितीने सर्वांना प्रेरणा दिली. त्यांच्या सहवासातून प्रत्येकाला मिळतो तो संस्कार, विनम्रता आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा.अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाला आयुष्यातील ४७ वा पुरस्कार मिळण्याचे नामांकन जाहीर झाले आहे हे खरंच त्यांच्या सततच्या परिश्रमांचे फलित आणि आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी क्षण आहे. मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा....!

आपल्याला हा पुरस्कार मिळावा हीच प्रार्थना आणि आपण असाच समाजाला दिशा देत रहावा हीच अपेक्षा

**- महेंद्र करंबे**
**हरी ओम रेल्वे प्रवाशी**
**भजन मंडळ परिवार**

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केन्हाळा येथे बालदिन अभिव्यक्ती सप्ताह उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक आदर्श शाळा केन्हाळा येथे दिनांक 7 नोव्हेंबर 2025 ते 14 नोव्हेंबर 2025 या कालावधीत बालदिन अभिव्यक्ती सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यात आला. विद्यार्थ्यांनी बाल सभा आयोजित करून आपल्याला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला. नाट्यजागर या अंतर्गत विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा झाडे जगवा' हा मोलाचा संदेश सर्वांना दिला. सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व जवाहरलाल नेहरू यांची माहिती भाषणाद्वारे सर्वांना दिली. यासोबतच रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, फुलांपासून सजावट, चित्रकला या स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले. या संपूर्ण सप्ताहात शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. सप्ताह यशस्वी करण्यासाठी सोमनाथ राणे,शेख चांद, श्रीनिवास जाधव,तेजस क्षीरसागर,महेंद्र सूर्यवंशी, रमेश पवार, संभाजी पाटील सुरेंद्र बबीरवाल शेख नासिर,जुबेर कुरेशी, शेख कलिमुद्दीन महानंदा राजपूत,रत्नकला इंगळे,वंदना साबळे, विभा मेश्राम,कविता तेली,पूनम सोनवणे,सुनीता निंभोरे,सदानंदी दोडके, विद्या सरदार, स्वप्नजा पाटील, तहसीन शेख, मुकिता पठाण,शाजिया शेख,शाहीन परवीन, शीतल महाले, कमल पांढरे यांनी परिश्रम घेतले. सर्व शिक्षकांच्या सहकार्यातून हा सप्ताह उत्साहात पार पडला. संचालन वंदना साबळे यांनी तर आभार पूनम सोनवणे यांनी मानले.

## सोन साखळी चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला खारघर पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** खारघर वसाहत परिसरात मोटर सायकल वरून सोनसाखळी हिसकावून फरार आरोपींचे अनेक गुन्हे घडत आहे. अशातील एक सराईत गुन्हेगाराला खारघर पोलिसांनी नाशिक मालेगाव परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले.

या आरोपीचे नाव हैदरअली सादिक अली सय्यद (वय ३७) असे असून आरोपीवर खारघर पोलीस ठाण्यातील तीन गुन्हे तसेच नाशिक येथील एक गुन्हा उघडकीस आला आहे. आरोपी याचा ठावठिकाणा हा आंबिवली, भिवंडी परिसरातून फरार होऊन लपून बसल्याने काहीएक माहिती पोलिसांना मिळत नव्हती. मागील १०-१२ दिवसापूर्वी सदर आरोपी हा मालेगाव परिसरात लपून बसला असलेबाबत माहिती मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली



सपोनि शरद बरकडे, पोउपनि सुरज कदम, जाधव, सहायक पोलीस फिरोज आगा, पोहवा कासार, खेडकर, खैरे, माळी आदींचे पथक येथे रवाना करून सलग ७ दिवस खारघर गुन्हे प्रकटीकरण पथकाने अनेक वेगवेगळ्या पद्धतीने वेषभूषा परिधान करून आरोपीवर पाळत ठेवुन आरोपीचे राहते परिसराबाबत माहिती घेतली. आरोपीचे नियमित येण्या जाण्याचा मार्ग निश्चित करून टी पॉइंट जागेवरील तिन्ही बाजूने सापाळा रचून आरोपी जेवणासाठी जात असताना धावत्या मोटार सायकल वर झडप घालून ताब्यात घेतले. आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केल्याने सौम्य बळाचा वापर करून आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपीवर औरंगाबाद, अयोध्या (उत्तरप्रदेश), जबलपूर (मध्यप्रदेश), गुजरात, कलकत्ता या ठिकाणी पाहिजे आरोपी असून दाखल गुन्ह्याची माहिती घेण्याचे काम पोलीस करत आहे.

## जर महायुती मधुन संधी दिली तर माझे सारखे भायखळा विभागात राहून सामाजिक कार्य करणारे कार्यकर्ते सुध्दा मुंबई महानगर पालिकेचे निवडणूक भाजप कडून लढू शकू - सुभाष तळेकर ( अध्यक्ष ) मुंबई डबेवाला असोसिएशन

**दैनिक युवक आधार**
**(प्रतिनिधी वार्ताहर) :** डबेवाला कामगारांना सर्वोतोपरी मार्गदर्शन करणारी गैर सरकारी संस्था मुंबई डबेवाला असोसिएशनने गेल्या लोकसभा, तसेच विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला (ठाकरे) पाठिंबा दिला होता. डबेवाल्यांचे प्रलंबित प्रश्न उद्धव ठाकरे सोडवतील आणि त्यांना परवडणाऱ्या दरात मुंबईत घर देतील,असा विश्वास डबेवाला असोसिएशनला त्यावेळी होता. त्यामुळे दोन्ही निवडणुकांच्या वेळी मुंबई डबेवाला असोसिएशनने शिवसेनेला (ठाकरे) पाठिंबा दिला होता. दरम्यान, निवडणुकीच्या वेळी दिलेली आश्वासन पूर्ण न केल्यामुळे डबेवाला असोसिएशनने शिवसेनेचे (ठाकरे) उद्धव ठाकरे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान जाहीर करण्यात आलेल्या शिवसेनेच्या वचननाम्यामध्ये मुंबईतील डबेवाल्यांसाठी काही आश्वासने दिली होती. यामध्ये,

१) मुंबईतील डबेवाल्यांना संघटित करून स्वतंत्र कंपनी स्थापन करणार, अशी कोणती ही कंपनी स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले गेले नाहीत..

२) या कंपनीला पहिल्या वर्षी किमान ५ कोटी रुपयांचे आर्थिक पाठबळ देणार, असे कोणतीही आर्थीक मदत देण्यात आली नाही.

३)तसेच सायकल खरेदी / पार्किंगसाठी सहकार्य, यासाठी काही ही सहकार्य केले गेले नाही.

४) मुलांचे शिक्षण, कुटुंबाला आरोग्य सेवा देण्यासाठी कार्पोरेट व सामाजिक विभागांमार्फत मदत, अशी कोणतीही मदत केली गेली नाही मुलांच्या शिक्षणासाठी नं कुटुंबाच्या आरोग्यासाठी काही ही मदत नाही

५) कार्यालय, तसेच विश्रांतीसाठी मुंबईत डबेवाला भवन बांद्रा येथे डबेवाला भवनासाठी जागा उपलब्ध



करून दिली आहे .. अशी आश्वासने देण्यात आली होती. यापैकी केवळ डबेवाला भवनाव्यतिरिक्त दुसरे कोणतेच आश्वासन पूर्ण केले नाही. याबाबत पत्रव्यवहारही केला होता. मात्र त्याचे साधे उत्तर आम्हाला मिळालेले नाही. यामुळे डबेवाला कामगारांमध्ये शिवसेनेबद्दल (ठाकरे) मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे, असे मुंबई डबेवाला असोशिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेत शिवसेनेची पाच वर्षे सत्ता होती. काही काळ दस्तुरखुद उध्दव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. तरीही वचने पूर्ण झाली नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, डबेवाला कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. प्रामुख्याने घरांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. हा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोडवला व डबेवाला कामगाराला दिवे अंजूर येथे पंचविस लाख पन्नास हजार रूपयांत घर देण्याचे निश्चित झाले आहे... या बाबत म्हाडाने पुढाकार घेतला आहे. तसेच डबेवाला भवन आद्यवत करण्यासाठी मुख्यमंत्री देवंद्र फडणवीस यांनी पाच कोटी रूपये निधी उपलब्द करून दिला... आमदार श्रिकांत भारती यांनी मेहनत घेऊन उत्तम असे डबेवाला भवन अद्यावत केले आहे डबेवाला कामगारांचे प्रश्न मुख्यमंत्री महोदय यांनी सोडवण्यासाठी सकारात्मक भुमीका घेतली आहे त्या मुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस डबेवाला कामगारांचे प्रश्न सोडवतील असा विश्वास डबेवाला कामगारांना आहे. या सर्व पार्श्वभुमीचा विचार करता येणाऱ्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मागे उभे राहण्याचा निर्णय " मुंबई डबेवाला असोसिएशन " ने घेतला आहे..

जर महायुती मधुन संधी दिली तर माझे सारखे भायखळा विभागात राहून सामाजिक कार्य करणारे कार्यकर्ते सुध्दा मुंबई महानगर पालिकेचे निवडणूक भाजप कडून लढू शकतात. ज्या प्रभात आम्ही रहातो तो प्रभाग क्र. २०७ ओपन आहे त्या मुळे येथे जर भाजपने संधी दिली तर एक डबेवाला मुंबई महानगर पालिकेत निवडून जावू शकतो.

# उरणमध्ये रेल्वे सेवेनंतर आता सुरू झाली आहे बेस्ट अंतर्गत 'चलो बस सेवा'

## सामाजिक कार्यकर्ते तुषार उत्तम गायकवाड यांच्या प्रयत्नांना यश



**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** चलो बस सेवा ही एक मोबाईल ॲप आधारित सेवा आहे जी बसचा थेट मागवा घेण्यास डिजिटल तिकिटे खरेदी करण्यास आणि पास मिळवण्यास मदत करते या सेवेमुळे बस प्रवाशांना बसची प्रत्यक्ष जागा आणि आगमन प्रस्तान वेळेची माहिती मिळते तसेच तिकीट ऑनलाईन बुक करता येते या प्रीमियम बस सेवांचाही समावेश आहे ज्या आरामदायी प्रवासासाठी उपलब्ध आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झालेल्या अटलसेतूवरून लवकरच उरणकरांसाठी बेस्टची प्रीमियम बस सेवा सुरू करण्यात यावी त्यामुळे अल्पावधीतच मुंबई गाठणे शक्य होणार आहे यासाठी उरणच्या नागरिकांची बऱ्याच वर्षांची इच्छा आता पूर्ण होत आहे. उरण तालुक्यातील वाढते औद्योगिकीकरण,वाढती लोकसंख्या , केंद्रशासित प्रोजेक्ट, रेल्वेसेवा आणि आता सुरू होवून पहात आहे ते आंतरराष्ट्रीय विमानतळ या दृष्टीने उरण तालुका हा मुंबई नवी मुंबई ला जोडलेला एक महत्त्वाचा तालुका आहे. रेल्वे सेवेमुळे आता मुंबई व नवी मुंबईचे अंतर उरणसाठी कमी होत आहे.आणि आता तर यामध्ये बेस्ट सेवेने भर टाकली आहे.

उरण मधून मुंबई कुलाबा, नवी मुंबई जाण्यासाठी मुंबई महानगर पालिका परिवहन सेवेची बेस्ट सेवा सुरु करण्यात यावी अशी अनेक वर्षांपासूनची नागरिकांची मागणी होती. ती मागणी आता पूर्ण झाली आहे नागरिकांनी उरण ते मुंबई , उरण ते नवी मुंबई बेस्ट बस सेवा सुरु होण्याचे स्वप्नपूर्ती होत आहे. उरण मधील द्रोणागिरी सेक्टर १२ येथे भूपाळी गृह संकुल (सोसायटी )मध्ये राहणारे सामाजिक कार्यकर्ते तुषार उत्तम गायकवाड यांनी उरण ते अटलसेतू मार्गा मुंबई या मार्गावर बेस्ट बस सेवा सुरु करण्यासाठी बेस्ट प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला होता. सतत पाठपुरावा सुरु ठेवला होता. तुषार उत्तम गायकवाड यांच्या प्रयत्नांना आता यश आले असून बेस्ट प्रशासनाने उरण ते बांद्रा स्टेशन पुर्व, उरण ते अटलसेतू मार्गे मुंबई कुलाबा, उरण ते वाशी अशी बस सेवा सुरु केल्याने प्रवाशी व नागरिकांच्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

उरणच्या इतिहासात पहिल्यांदाच उरण ते नवी मुंबई, उरण ते मुंबई अशी सेवा सुरु झाली आहे. नागरिकांनी, चाकरमानी विद्यार्थी प्रवाशी वर्गांनी याचे श्रेय सामाजिक कार्यकर्ते तुषार उत्तम गायकवाड यांना दिले आहे. शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता भूपाळी गृह संकुल सोसायटी द्रोणागिरी सेक्टर १२ येथून पहिली व दुसरी बस मुंबई व नवी मुंबई कडे रवाना झाल्या. बस सेवा सुरु झाल्या.यावेळी एकूण २ बस आल्या होत्या. या बसेसचे स्वागत सामाजिक कार्यकर्ते तुषार उत्तम गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संघ रजि. द्रोणागिरीचे अध्यक्ष नामदेव कुरणे, भूपाळी सोसायटीचे अध्यक्ष दिनेश पवार,भैरवी सोसायटी अध्यक्ष नवनाथ डोके,भूपाळी सोसायटी सेक्रेटरी लक्ष्मण मोटे,सामाजिक कार्यकर्ते तुकाराम खंडागळे, भूपाळी सोसायटी, भैरवी सोसायटी, मल्हार सोसायटी नागरिक, ग्रामस्थांनी केले. तर बेस्ट प्रशासनाच्या वतीने परिवहन सेवा चलो बस सेवेचे इन्स्पेक्टर भागवत कांबळे, इन्स्पेक्टर प्रमोद कोकरे उपस्थित होते. या बस सेवेचे उदघाटन सामाजिक कार्यकर्ते तुषार उत्तम गायकवाड यांनी केले.या वेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे तुषार उत्तम गायकवाड यांनी स्वागत केले.व आभार मानले.यावेळी उपस्थित डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक द्रोणागिरी रजि. संघाचे अध्यक्ष नामदेव कुरणे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

प्रीमियर "चलो बस" बेस्ट सेवा सुरू केल्याने प्रवासी वर्गाची वेळेची बचत होणार आहे, त्याचप्रमाणे नागरिकांना एसी वातावरणात ,आरामदायी व शांततेत प्रवास करता येणार आहे. पहिल्यांदाच ही बस सेवा सुरू झाल्याने नागरिकांनी प्रवासी वर्गणी बेस्ट प्रशासनाचे व सामाजिक कार्यकर्ते तुषार उत्तम गायकवाड यांच्या आभार मानले.

**बेस्ट परिवहन चलोबस सेवेची वैशिष्ट्य :-**

- रविवार खेरीज सिडको जेएनपीटी ते नवी मुंबई, सिडको जेएनपीटी ते मुंबई (बांद्रा ), सिडको जेएनपीटी ते अटलसेतू मार्गा मुंबई या मार्गावर बस सेवा सुरु.
- रात्री ९ ते रात्री १२:३० या वेळेत सिडको जेएनपीटी ते वाशी, वाशी ते सिडको जेएनपीटी अशी स्वतंत्र बस सेवा सुरु
- कायमस्वरूपी ऑनलाईन सेवा आहे. नागरिकांना बस मधून प्रवास करायचे असल्यास चलो बस ॲप डाउनलोड करून ऑनलाईन नोंदणी करूनच बस मध्ये बसावे लागेल
- ऑनलाईन नोंदणी किंवा ऑनलाईन बुकिंग केलेले नसेल तर बस मध्ये बसता येणार नाही.
- प्रवाशी कुठेही असला तरी त्याने अगोदर ऑनलाईन नोंदणी (बुकिंग )केली तर त्याला बस मधून प्रवास करता येतो.
- चलो बस ॲप मध्ये कोणती बस कुठे आहे. एखादी बस कोणत्या स्थानकावर हे ॲप मध्ये त्वरित कळणार.
- प्रीमियम सेवा (व्ही आय पी सेवा )असल्याने ऑफलाईन सेवा कायमस्वरूपी बंद आहे. म्हणजेच प्रवाशांना कधीही कुठेही डायरेक्ट बस मध्ये चढता येणार नाही. ऑनलाईन बुकिंग असेल तरच बस मधून प्रवास करता येणार आहे.
- द्रोणागिरी ते अटल सेतू मार्गे मंत्रालय मुंबई अशी बस सेवा सुरु.
- सिडको जेएनपीटी ते बांद्रा
- सिडको जेएनपीटी ते वाशी (नवी मुंबई )
- थंड, वातानुकुलीत शांत आरामदायी प्रवास सेवा
- जलद, सुरक्षित व उत्तम सेवा
- कोणत्याही नागरिकांना चलो बस सेवेचा लाभ घ्यायचा असेल तर चलो बस सेवा ॲप डाउनलोड करूनच प्रवास करावा लागेल. ही बुकिंग २४ तास उपलब्ध आहे.
- बस सेवेचे वेळापत्रक हे चलो बस ॲप वर पाहता येणार आहे
- बस तिकीटाची रक्कम ऑनलाईन बुकींग करतेवेळी दिसून येईल.

## पंजाब येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय कराटे डो चॅम्पियनशिपमध्ये सीबीएससी सेंट विल्फ्रेड स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश




**दैनिक युवक आधार**

**रसायनी (आनंद पवार) :** अमृतसर पंजाब येथे८व९ नोव्हेंबर रोजी संपन्न झालेल्या अखिल भारतीय कराटे डो चॅम्पियनशिप २०२५ मध्ये पनवेल शेडुंग येथील सेंट विल्फ्रेड स्कूलच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले.अखिल भारतीय कराटे डॉ चॅम्पियनशिप २०२५ अमृतसर पंजाब येथे ८ व ९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती या चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्रातून विविध शाळेतून अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते.या अखिल भारतीय कराटे डो चॅम्पियनशिप मध्ये शेडुंग येथील सेंट विल्फ्रेड स्कूलची कुमारी सानवी जालरिया (कुमिते) आणि सब जूनियर मुलींच्या गटात (काता) या प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले.१३ते१५ वर्ष वयोगटातील (कॅडट्स कुमिते) मध्ये जयदीप गिरी याने रोप्य पदक पटकावले.१०ते १२ वर्षे वयोगटातील (सब ज्युनिअर मध्ये काता) मध्ये रोप्य पदक तर (सब ज्युनिअर कुमिते) मध्ये कुमारी नियती घावरी हिने कास्यपदक पटकावले. तसेच १० ते १२ वयोगटातील (सब ज्युनिअर कुमिते) मध्ये आदित्य घाडगे याने रोप्य पद जिंकले तर १३ ते१५ वर्ष वयोगटातील (कॅडेट कुमिते) या स्पर्धेत मोक्ष भारद्वाज याने कास्यपदक पटकावल्याने या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक केशव बढाया,मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.मंजुळा वेणुगोपाल,सीबीएससी बोर्डाच्या मुख्याध्यापिका सौ प्रीती सिंह,महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या क्रीडा विभागातील प्रशिक्षक गुरुपीत सिंह यांनी अभिनंदन केले.सेंट विल्फ्रेडच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेचे नाव उंच शिखरावर नेल्याने शालेय व्यवस्थापनाने यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## कै द्वारकाबाई थेपडे इंग्लिश मीडियम स्कूल म्हसावद येथे बक्षीस वितरण सोहळा उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**


**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

दि 13 नोव्हेंबर 2025 रोजी कै. द्वारकाबाई थेपडे इंग्लिश मीडियम स्कूल म्हसावद तालुका जिल्हा जळगाव येथे रंगोउत्सव सेलिब्रेशन लेवल आर्ट स्पर्धा घेण्यात आली होती त्यात शाळेचा चौथा क्रमांक आला. यात थम प्रिंटिंग कलरिंग अँड हॅन्ड रायटिंग अशा तीन .प्रकारच्या स्पर्धा होत्या या शाळेतील 363 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्याच विद्यार्थ्यांना 85 पारितोषिक मिळाले तसेच दोन उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री एस एम पिंगळे सर हे होते तसेच प्रमुख पाहुणे म्हसावद गावाचे माननीय सरपंच संजय मोरे होते प्रथमतः सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पवन येवले सर यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले सर्व विद्यार्थ्यांना सौ संगीता पाटील मॅडम यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन सौ उज्वला सोनवणे मॅडम यांनी केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी कलाशिक्षक रिंकू बाविस्कर मॅडम यांनी परिश्रम घेतले. त्यांना सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य यांचा ५२ वा स्मृतिदिन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** स्वातंत्र्यसैनिक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते, गोवा मुक्ती व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील, गिरणी कामगारांचे झुंजार नेते, मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक आणि विरोधी पक्ष नेते व लोकप्रिय आमदार दिवंगत कॉम्रेड गुलाबराव भाऊराव गणाचार्य यांचा ५२ वा स्मृतिदिन गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी चिंचपोकळी (पश्चिम) येथे कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य चौक (आर्थर रोड नाका) मुंबई येथे सकाळी १० वाजता त्यांच्या स्मारका जवळ साजरा करण्यात येणार आहे. विविध पक्षातील कार्यकर्ते त्यांना




श्रद्धांजली अर्पण करती असे कॉ. गुलाबराव गणाचार्य मेमोरियल संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री अनिल गणाचार्य यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## हमरापुर विभागातील जोहे,रावे शाळेत काँग्रेस पर्यावरण विभागातर्फे संगणकचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके**

मराठी शाळेतील मुलांना लहानपणापासूनच संगणकचे ज्ञान प्राप्त करण्याकरता आज रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी पर्यावरण विभाग तर्फे राजीव पाटील, जे एस डब्ल्यू फाउंडेशन यांच्या वतीने पेण तालुक्यातील हमरापुर विभागातील जोहे गावातील प्राथमिक मराठी शाळेत तसेच रावे गावातील सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक हायस्कूल या ठिकाणी संगणक (कॉम्प्युटर)



वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमा वेळी उपस्थित रावे येथील शाळेचे कमिटी सदस्य सामाजिक नेते काशिनाथ पाटील काँग्रेस तालुका अध्यक्ष अशोक मोकल ग्रामपंचायत सदस्य शंकर मोकल शाळेचे माजी अध्यक्ष गणेश मोकल शाळेच्या शिक्षिका मुख्याध्यापक रावे हायस्कूल येथे मुख्याध्यापक शेडगे सर,एम. टी.सर, लेखापरीक्षक क्लार्क,शिपाई, झजोहे गावातील सामाजिक कार्यकर्ते रमेश मोकल आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## आंगवली येथे श्री.अमित रेवाळे यांनी स्वखर्चाने केली रस्त्याची साफसफाई

**दैनिक युवक आधार**

**कोकण (शांताराम गुडेकर)**

खेड्यापाड्यात वाडीवस्थित आज रस्तोरस्ती दाट झाडी वाढलेली दिसत आहे, अश्यातच जंगली जनावरांची भीती आता गावा गावांत वाढत चालली आहे. त्यामुळे गावांतील वाड्यांतील मुख्य रस्ते, पायवाटा स्वछ ठेवणे अत्यावश्यक आहे.

गेली कित्येक वर्षे विकासापासून स्थानिक प्रशासनाने वंचित ठेवलेल्या आंगवली गावकर वाडी वस्तीला आता अमित रेवाळे यांच्या वतीने नवा राजकीय सामाजिक उदय दिसत आहे.

स्वतःच्या खिशाला भार देऊन अमित रेवाळे हे गावात व पंचक्रोशीत नवनवीन उपक्रम राबवत असतात.

त्यामुळे आता देखील त्यांनी स्वखर्चाने आंगवली रेवाळेवाडी मुख्य रस्ता ते गावकर वाडी येथील सलग ३ वर्षे साफसफाई केली.

अमित रेवाळे यांच्या कोणत्याही प्रशासकीय पदावर नसताना देखील लोकोपयोगी कामांमुळे



गावातून थोरामोठ्यांच्या आशिर्वाद आणि कौतुकास्पद शब्दांचा वर्षाव होत आहे. रेवाळे यांच्या समाजकार्याची दाद गावातील नागरिक येणाऱ्या काळात नक्कीच घेतील अशी आशा आहे हे लक्षात येते.

## सर्व समाजाला सोबत घेऊन सोलापूर महानगरपालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकवणार – ना. अण्णा बनसोडे

### सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा “अब की बार ७५पार” चा नारा...

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** “अब की बार ७५ पार” चा नारा देत सोलापूर महानगरपालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवण्याचा निर्धार विधानसभा उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्ह्याचे सह संपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला. सह संपर्क मंत्रीपदी निवड झाल्यानंतर प्रथमच सोलापूर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी यांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीत शहरातील राजकीय, संघटनात्मक आणि विकासकामांचा विस्तृत आढावा घेण्यात आला.आगामी दौऱ्यात महानगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्या सोबत बैठक घेऊन रखडलेल्या कामांना गती देण्याची मागणी करण्यात आली. जुळे सोलापूरसह विविध भागातील करदात्यांना योग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचेही मत पदाधिकाऱ्यांनी मांडले.

लिंगायत, पद्मशाली, बौद्ध, मुस्लिम तसेच सर्व समाजांना सोबत घेऊन सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले. अजित दादांनी पुणे–पिंपरी चिंचवडचे विकास मॉडेल सोलापूरमध्ये आणावे. महात्मा बसवेश्वर स्मारक व वीरशैव लिंगायत भवनासाठी अतिरिक्त निधी मिळावा, अशी मागणीही पदाधिकाऱ्यांनी बैठकीत केली. शहराच्या विकासासाठी जे पक्ष सोबत येतील त्यांच्यासोबतच आगामी महानगरपालिका निवडणुका लढवण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.



शहरातील पक्षाची ताकद अधिक बळकट करण्यासाठी वार्डनिहाय बैठकांचे आयोजन, शहरात जास्तीत जास्त दौरे, तसेच पक्षविस्तारावर लक्ष केंद्रीत करणार असल्याचे सोलापूर जिल्ह्याचे सह संपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी बैठकीत ग्वाही दिली. पक्षातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देणार. सर्व समाजाला सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार. पदाधिकाऱ्यांना पक्षाची, शासनाची आणि वैयक्तिक ताकद देऊन सोलापूरच्या विकासासाठी संपूर्ण ताकदीने काम करणार, असा विश्वास ही विधानसभा उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्ह्याचे सह संपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी आढावा बैठकीत दिला.

बसपा, काँग्रेस, AIMIM, भाजप आणि इतर पक्षातील नगरसेवकांनी आधीच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून अजून काही जण पक्षात येण्यास इच्छुक असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. सोलापूर जिल्ह्याचे सह संपर्क मंत्री निवड झाल्याबद्दल बैठकीत पदाधिकाऱ्यांनी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे याचे विशेष अभिनंदन केले.

## पेण फेस्टीवल 2025 : रोह्याचा शुभम दिवेकर ठरला मिस्टर रायगड 2025 चा अंतिम विजेता

### तर अलिबागचा संजोग पाटील उपविजेता

**दैनिक युवक आधार**

**पेण- दीपक लोके**

पेण नगरपरिषदेच्या मैदानावर स्वररंग पेण तर्फे भरविण्यात आलेल्या पेण फेस्टिवल मध्ये जल्लोषपूर्ण वातावरणात मिस्टर रायगड 2025 ही स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत रोह्याचा शुभम सतीश दिवेकर हा मिस्टर रायगड 2025 चा अंतिम विजेता ठरला. तर अलिबागचा संजोग पाटील याने स्पर्धेत द्वितिय व पेणचा तन्मय गावंड याने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील 19 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेतील बेस्ट कॉस्च्युम आशुतोष मनोहर कांबळे (बदलापूर), बेस्ट हेअर साहिल निलेश तलाठी (महाड), बेस्ट स्माईल भावेश चिले (खोपोली), बेस्ट पर्सनॅलिटी चंद्रमा रामचंद्र (दिघा), बेस्ट फोटोजनिक अथर्व विजय सरके (अलिबाग) या स्पर्धकांना अवॉर्ड देऊन सन्मानीत करण्यात आले. सदर स्पर्धेचे परिक्षण




पत्रकार कमलेश ठाकूर, विजय मोकल, यशश्री सुरावकर, करिष्मा मोकल यांनी केले तर कोरियोग्राफी जयेश पाटील (अलिबाग) यांनी केले.

मिस्टर रायगडच्या सर्व विजेत्यांना स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, खजिनदार भारती साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, अनिकेत साळवी,निशा साळवी, अक्षता सावंत, अथर्व सावंत, सारिका पाटील, मृगज कुंभार, शाल्मली भिडे, अनिरुद्ध पवार, नेहा कुंभार, अश्विन पाटील, तन्मय शिर्के, यश बांदीवडेकर, प्रसाद म्हात्रे, प्रशांत पाटेकर, दर्शना पाटेकर,किरण मोहिते,आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष टेंबे यांनी केले.

रायगड जिल्ह्यासह मुंबई, पेण, नवी मुंबई, लोणावळा, अलिबाग, खोपोली, माणगाव, महाड, ठाणे, उरण अश्या विविध भागांतील एकूण 19 स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. ट्रेडिशन,इन्ट्रोड्यूस राउंड, वेस्टन राउंड व प्रश्नोत्तर राउंड अशा 2 राउंड मध्ये स्पर्धा सादर करण्यात आली. या स्पर्धेला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. 17 नोव्हेंबर 2025 पर्यंत सुरू असलेल्या पेण फेस्टिवलला दिवसेंदिवस रसिकांची गर्दी वाढत आहे.

# आदिवासींच्या जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीचे रक्षण करू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर**

**नागपूर :** राज्य शासन प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टा देत आहे व त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करीत आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासन आदिवासी विकास विभागाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. जनजाती वर्षाच्या निमित्ताने राज्य शासन भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीन व संस्कृतीचे रक्षण करेल, असा विश्वास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव वर्षांतर्गत येथील मानकापूर विभागीय क्रीडा संकुलात राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे 15 ते 17 नोव्हेंबर 2025 दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी श्री. फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश कुमार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'जनजातीय वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील आदिवासी जननायकांचे चरित्र जनतेसमोर आणण्याचे तसेच त्यांचे स्मारके उभारण्याचा कार्यक्रम दिला आहे. राज्य शासनानेही राज्यातील आदिवासी नायकांचा गौरवशाली इतिहास पुस्तक रूपाने जनतेसमोर आणला आहे. विविध योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्यात येत आहे. राज्यातील आदिवासी आश्रम शाळांचा दर्जा सुधारला आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी स्वयम् योजना राबविण्यात येत आहे. एकही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राणी दुर्गावती सक्षमीकरण योजनेद्वारे दीड लाख आदिवासी महिलांना पन्नास हजार ते दीड लाखांपर्यंत मदत करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात आदिवासी समाजाच्या विकासासाठी धरती आबा कार्यक्रम देशभर राबविण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात धरती आबा कार्यक्रम राबविण्यासाठी 17 मंत्रालयांच्या 25 योजना एकत्र करून 32 जिल्ह्यातील 5 हजार गावांतील प्रत्येक आदिवासी पाड्यांवर रस्ते, पाणी, वीज, रोजगार आणि महिला विकासाच्या योजना पोचविल्या जात आहेत. आश्रमशाळांचे डिजिटायजेशन झाले आहे. 37 एकलव्य शाळांतील विद्यार्थ्यांना



राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टे देण्यात येत आहे. विविध कल्याणकारी योजनांद्वारे आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासन आदिवासी विकास विभागाच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचेही त्यांनी सांगितले.

**आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करूया - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

देशाच्या विकासात आदिवासी समाजाचे मोठे योगदान आहे. भगवान बिरसा मुंडा हे या समाजाच्या अभिमान व स्वाभिमानाचे प्रतिक आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहून आपली समृद्ध परंपरा जपण्याचे कार्य हा समाज करीत असून त्यांच्या सर्वांगिक विकासाठी संकल्प करण्याचे आवाहन यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. जंगलात राहत असल्याने व शहरी भागापासून दूर असल्याने त्यांच्या विकासासाठी काम होणे गरजेचे आहे. आदिवासींना योग्य संधी मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच हस्तउद्योग, कुटीर उद्योग आदींच्या माध्यमातून व आदिवासी विकासाच्या विविध योजना केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत. आदिवासींच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्नरत आहे. त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी आर्थिक विकासाचे मॉडेल आखून शासन कार्य करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले की, एप्रिल महिन्यापासून भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा सांस्कृतिक मंचाची स्थापना केली. याद्वारे 40 हजार युवा-युवतींची नोंदणी व विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. जनजातीय गौरव वर्षांतर्गत करण्यात आलेल्या विविध आयोजनांची त्यांनी माहिती दिली. राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सव आयोजनामागील भूमिका व कार्यक्रमाची माहितीही त्यांनी दिली. राणी दुर्गावती योजनेच्या माध्यमातून आदिवासी महिला लखपती दीदी होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण**

सुराबर्डी, नागपूर येथील गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण उपकेंद्राचे भूमिपूजन, शासकीय आश्रमशाळा, घानवळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि. पालघर येथील इमारतीचे लोकार्पण, शासकीय आश्रमशाळा पळसुंडा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील प्रयोगशाळा इमारतीचे लोकार्पण. शासकीय आश्रमशाळा, देवगाव, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक येथील संकुलात मुलींच्या वसतिगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे यावेळी करण्यात आले. आदिवासी विभागाच्या वतीने आयोजित विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरवही त्यांच्या हस्ते करण्यात आला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रमय पुस्तका'चे आणि 'आदिवासी परंपरा व सर्जनशिलता' यावर आधारित कॉफीटेबल बुकचे प्रकाशन झाले. आमदार सर्वश्री रविंद्र चव्हाण, डॉ. आशिष देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांचीही यावेळी उपस्थिती होती. आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी प्रास्ताविक केले तर आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या आयुक्त दीपा मुधोळ मुंडे यांनी आभार मानले.

# खरे समाजवादी बाळासाहेब ठाकरे !



आश्चर्य वाटलं नां शीर्षक वाचून ? बाळासाहेब ठाकरे आणि समाजवादी ? होय, खरं आहे. कारण समाजवादी म्हणजे ढोंगी नव्हेत. एका जमान्यात शिवसेना आणि समाजवादी पक्ष एकत्र येऊन काम करीत होते. बाळासाहेब ठाकरे आणि प्रकाश मोहाडीकर हे १९५५ साली 'श्याम' हे नियतकालिक एकत्रितपणे चालवित होते. १९५६ साली संयुक्त महाराष्ट्र पत्रिका साथी दिनू रणदिवे आणि साथी अशोक पडबिद्री यांनी चालविली . प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे त्याचे शीर्षक देत असत तर बाळासाहेब ठाकरे हे मावळा या नांवाने व्यंगचित्र काढीत असत. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेत मानाचे पान ज्यांना दिले असे दत्ताजी नलावडे, प्रमोद नवलकर हे राष्ट्र सेवा दलाच्या मुशीतून आले होते दादा कोंडके आणि साबिरभाई शेख हे पक्के दोस्त सुद्धा राष्ट्र सेवा दलाचेच. आणि विरोधकांच्या टीकेला उत्तर देण्यासाठी १९८९ साली दैनिक सामना सुरु करतांना पहिले कार्यकारी संपादक म्हणून अशोक पडबिद्री यांच्यावर जबाबदारी सोपविली होती, तेही समाजवादीच. मधु दंडवते, प्रमिला दंडवते यांनी निवडणुकीत युती केली होती. मग ती महापालिका असो की लोकसभा. शिवसेना आणि समाजवादी हातात हात घालून काम करीत होते. बाळासाहेब ठाकरे हे जात पात मानत नव्हते. 'रिकाम्या हाताला काम आणि रिकाम्या पोटाला अन्न' ही संकल्पना बाळासाहेब ठाकरे यांनी स्पष्टपणे मांडली होती. डॉ. मनोहर जोशी यांना ब्राह्मण म्हणून बाळासाहेबांनी मुख्यमंत्री किंवा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी निवडले नव्हते तसेच नारायण राणे यांना मराठा, लीलाधर डाके -गणेश नाईक यांना आगरी म्हणून आणि छगन भुजबळ यांना माळी म्हणून नव्हे तर ते त्यांची कार्यक्षमता म्हणून त्या त्या पदावर निवडले होते. शिवसेनेत बाळासाहेब ठाकरे यांनी पदे देतांना त्यांची कार्यक्षमता पाहून पदे दिली होती. कडवट मुस्लिम नेते शेख साबीर हाजी करीम म्हणजेच साबिरभाई शेख यांना निष्ठावंत राष्ट्रभक्त म्हणून राज्याचा कामगार मंत्री बनविला. कर्तबगारी पाहून बाळासाहेब ठाकरे यांनी प्रत्येकाला जबाबदारी दिली होती. अँथनी ब्रिटो, अंजुम महंमद, प्रीतिश नंदी, चंद्रिका केनिया अशा अनेकांना बाळासाहेब ठाकरे यांनी संधी उपलब्ध करून दिली. बाळासाहेब ठाकरे हे मुसलमान बांधवांच्या विरोधात नव्हते तर पाकधार्जिण्यांच्या ते विरोधात होते. मोहम्मद अझरुद्दीनची म्हणूनच त्यांनी वाखाणणी केली होती. जावेद मियाँदाद सुद्धा 'मातोश्री' वर येऊन वाहव्वा करुन गेला होता. हुसेन दलवाई, वसंत चव्हाण यांच्यासह अनेकांनी या भूमिकेचं कौतुक केलं होतं. मला आठवतं, मी त्यावेळेला अकरा वर्षांचा होतो. १९ जून १९६६ या दिवशी बाळासाहेबांनी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी 'शिवसेना' या संघटनेची स्थापना केली. 'हटाव लुंगी, बजाव पुंगी' म्हणत शिवसेनेनं आपलं स्वरुप दाखवायला सुरुवात केली होती. बाळासाहेबांवर प्रादेशिक वादाचे आरोप होऊ लागले. शिवसेनेच्या स्थापनेच्या बरोब्बर आठ दिवस आधी म्हणजे साने गुरुजींच्या पुण्यतिथीदिनी ११ जून १९६६ रोजी आमचे पिताश्री वसंतराव त्रिवेदी यांनी 'आहुति' साप्ताहिक अंबरनाथहून सुरु केलं होतं. शिवसेनेच्या स्थापनेमुळे बाळासाहेबांवर चौफेर टीका होत असतांना 'आहुति' मध्ये शिवसेनेचं स्वागत करणारा अग्रलेख वसंतरावांनी लिहिला होता.

शिवसेनेने आपली सुवर्ण महोत्सवी वर्षाची झंझावाती वाटचाल पूर्ण करुन विक्रमी शतकी घोडदौड करण्यास सिद्ध झाली आहे. एकचालकानुवर्ती संघटनेची 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये दिमाखदार नोंद ही केवळ आणि केवळ शिवसेनेचीच आहे, ज्याचा प्रत्येक मराठी, प्रत्येक हिंदु आणि प्रत्येक राष्ट्राभिमानी व्यक्तीला निश्चितपणे गर्व आहे. आज योगायोगाची गोष्ट म्हणजे बाळासाहेबांची शिवसेनेने आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्षानंतरही राज्य सरकार आणि कित्येक महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये सत्तास्थानी राहून जनहिताचे कार्य केले आहे. केंद्रात सुद्धा शिवसेनेने सत्तास्थान भूषविले होते. नंदमूरी तारक रामाराव म्हणजेच एन. टी. रामाराव यांनी तेलुगु भाषेच्या अस्मितेसाठी तेलुगु देसम् स्थापन केला आणि अवघ्या नऊ महिन्यात तो आंध्र प्रदेशात सत्तेवर आणला पण मराठी स्वाभिमान टिकविणाऱ्या शिवसेनेला सत्तेवर येण्यासाठी १९६६ पासून १९९५ पर्यंत इतकी वर्षे वाट पहावी लागली. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्याच भाषेत सांगायचं झालं तर लोकांना त्यांच्या लायकीप्रमाणेच सरकार मिळत असतं. १९९५ ते १९९९ या दरम्यान निव्वळ शिवसेनेची एकहाती सत्ता नव्हती. १९९५ ते १९९९ या काळात हिंदुत्वाची शिवसेना-भारतीय जनता पक्षाची अभेद्य युतीची शिवशाहीची सत्ता होती. २५ सप्टेंबर २०१४ रोजी ही अभेद्य युती तोडण्याची घोषणा झाल्यानंतर १५ ऑक्टोबर २०१४ रोजी झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे हे एकटे महाभारतातल्या कुरुक्षेत्रावरच्या अभिमन्यूसारखे लढले आणि ६३ वाघ विधानसभेवर निवडून पाठविण्यात जबरदस्त यशस्वी ठरले. २८८ च्या विधानसभेत कुणालाही स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते म्हणून केवळ जनमताचा कौल आणि जनादेश शिरोधार्य मानून तसेच देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांनी आपली खुर्ची टिकवण्यासाठी जी साद घातली तिला प्रतिसाद म्हणून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्थिर सरकार देण्यासाठी ५ डिसेंबर २०१४ रोजी सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. सत्तेत सहभागी असली तरी शिवसेनेने जनतेशी असलेली नाळ तुटू न देता सतत जनतेच्या पाठीशी उभे राहण्याची, बाळासाहेबांनी दिलेल्या ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण या सूत्राप्रमाणेच आजवर भूमिका यथा योग्य पार पाडली आणि यापुढेही ही घोडदौड वायुवेगाने होणार हे निःसंशय. शिवसेनेच्या मंत्र्यांचं काम अगदी वाखाणण्यासारखं झाले. अर्थात, शिवसेनेच्या पन्नास वर्षाच्या वाटचालीचा साधा आढावा जरी घ्यायचा म्हटला तरी डॉ. मनोहर गजानन जोशी यांनी मुंबई विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधापेक्षा मोठे खंडशः ग्रंथ लिहिले तरी ते कमी पडतील. शिवसेनेने अनेक वादळे, असंख्य आव्हाने, अगणित संकटे पचवलीत, परतवून लावलीत आणि 'सामना'ही केला. उन्हाळे, पावसाळे अनुभवले आणि आपली दाहकता, जाज्वल्य ज्वलाग्राही घणाघाती कणखर परखड विचार इतकेच नव्हे तर ज्वलंत हिंदुत्व या आभुषणांनी नटविली. या आभुषणांसमोर तकलादू कृत्रिमतेला कधीही शिवसेनेने स्थान दिले नाही. अनेक जण आले आणि गेले पण बाळासाहेबांच्या शिवसेनेला काही फरक पडला नाही. अनेकांना आम्ही म्हणजेच संघटना असा जो दर्प चढला होता त्यांना काळाने त्यांची जागा, पायरी दाखवून दिली. 'वाघ एकला राजा, बाकी खेळ माकडांचा' याचा प्रत्यय आणून दिला.
शिवसेना ही जगाच्या पाठीवरची अशी एकमेव संघटना आहे की ज्या संघटनेने आपल्या पन्नास पंचावन्न वर्षाच्या यशस्वी वाटचालीत अनेकांना लाल दिवा मिळवून दिला पण या लाल दिव्याचा मोह शिवसेनाप्रमुखांनी बाळगला नाही. लाल दिव्याच्या गाड्या आपल्या कार्यकर्त्यांना भरभरुन मिळवून दिल्या, अगदी आपली अर्धी हयात काँग्रेसमध्ये घालवूनही ज्यांना त्यांच्या हाय कमांड ने देण्याची दानत दाखविली नाही अशांनाही केवळ समाजकारण हाच ध्यास उराशी बाळगलेल्या बाळासाहेबांनी सत्तेची फळे चाखण्याची संधी मिळवून दिली. अर्थात ते ही संधीसाधूच निघाले. बाळासाहेबांवर सडकून टीका करण्याचं काम मीडिया अव्याहतपणे करीत आली पण त्याच मीडिया मधल्या विद्याधर गोखले, नारायण आठवले, प्रीतिश नंदी, भारतकुमार राऊत, संजय निरुपम आणि संजय राऊत अशा एक दोन नव्हे तर तब्बल सहा पत्रकारांना संसदेत पाठवण्याचं धारिष्ट्य बाळासाहेबांनी दाखवलं.
१९९५ साली शिवशाही सरकार आलं तेंव्हा त्या पहिल्याच वर्षी बाळासाहेबांवर दोन कौटुंबिक आघात झाले. आधी तमाम शिवसैनिकांच्या लाडक्या माँसाहेब मीनाताई ठाकरे यांना काळाने आपल्यातून हिरावून नेलं आणि नंतर चिरंजीव बिंदुमाधव ठाकरे यांना रस्ता अपघातात आपले प्राण गमवावे लागले.
बाळासाहेबांवर मधल्या काळात यशस्वी हृदय शस्त्रक्रियाही झाली. अनेक संकटं लीलया झेलणाऱ्या या झुंझार सेनापतीनं १७ नोव्हेंबर २०१२ रोजी या जगाचा निरोप घेतला. १७ आणि १८ नोव्हेंबर २०१२ हे दोन दिवस केवळ मुंबई, महाराष्ट्रच नव्हे तर अवघ्या विश्वाने चमत्कार पाहिला. ज्या शिवतीर्थानं बाळासाहेबांच्या लाखोंच्या घणाघाती सभा अनुभवल्या त्याच शिवतीर्थानं हा झुंझार सेनापती आपल्या कुशीत चिरनिद्रेसाठी विसावतांना पाहिला. अरबी सागरालाही लाजवेल अशा जनसागराला आपल्या या अनभिषिक्त सम्राटाला अखेरचा जय महाराष्ट्र करतांना जसा पाहिला तद्वतच घटनात्मक सत्तेचं कोणतंही पद न भूषविणाऱ्या पण शासकीय तोफांची अंतीम सलामी स्वीकारतांनाही अवघ्या विश्वानं पाहिला. अवघी मुंबापुरी दोन दिवस एकाच जागी थांबली होती, थबकली होती, निःशब्द झाली होती. हा खऱ्या अर्थानं अनभिषिक्त सम्राट आणि हीच विश्वविक्रमी शिवसेना म्हणजे न भूतो न भविष्यती असंच म्हणावं लागेल आणि बाळासाहेब ठाकरे हे खरे समाजवादी होते, ढोंगी समाजवादी नव्हते हे सर्वच राजकीय पक्ष मान्य करतील. गोरेगाव पूर्व पश्चिम भागांना जोडणाऱ्या उड्डाण पुलाला ज्येष्ठ समाजवादी नेत्या साथी मृणालताई गोरे यांचे नांव देण्याचे काम शिवसेनेने करुन शिवसैनिक आणि सेवा दल सैनिक यांच्यामध्ये सेतू निर्माण केला. महाराष्ट्रात बदललेल्या राजकीय परिस्थिती मुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र विकास आघाडी सरकारचे नेतृत्व स्वीकारले. सर्वच संकटांवर मात करुन ते यशस्वीपणे राज्य शकट चालविले. बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद उद्धव आणि आदित्य या पितापुत्रांना निश्चितच आहेत. ते बाळासाहेब ठाकरे यांनी दाखविलेल्या मार्गाने राज्य आणि देशाला निश्चित दिशा दिल्याशिवाय राहणार नाहीत. आई एकवीरा आणि आई तुळजाभवानी भरभरुन आशीर्वाद देत राहील हे निःसंशय. खरे समाजवादी आणि कडवट हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना मानाचा मुजरा !!.

**- योगेश वसंत त्रिवेदी,**

# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेत पुणे-बारामती परिमंडल संघाला अजिंक्यपद, नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडल संघ उपविजेता

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

**नागपूर :** महावितरणच्या 2025-26 च्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती परिमंडल संघाने वर्चस्व गाजवत सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले. गतवर्षी उपविजेता असलेल्या पुणे-बारामती संघाने हे तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. तर नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडल संघाने स्पर्धेतील उपविजेतेपद मिळविले.

अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात दि. 12 नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या चार दिवसीय राज्यस्तरीय स्पर्धेचा शनिवारी (दि. 15) सायंकाळी समारोप झाला. यावेळी महावितरणचे संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प) व राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्याहस्ते अजिंक्यपदाचा करंडक पुणे-बारामती परिमंडल संघाकडून मुख्य अभियंता सुनील काकडे, अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भुपेंद्र वाघमारे व श्रीकृष्ण वायदंडे आणि सहकाऱ्यांनी स्वीकारला. तर उपविजेत्या नागपूर-चंद्रपूर-गोंदिया संघाकडून मुख्य अभियंता सुहास रंगारी, दिलीप दोडके, हरीष गजबे व सहकाऱ्यांनी करंडक स्विकारला.

पारितोषिक वितरणच्या कार्यक्रमाला स्पर्धेचे मुख्य समन्वयक व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता अशोक साळुंके, मुख्य अभियंता राजेश नाईक, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे यांची उपस्थिती होती. पाहुण्यांच्या हस्ते या स्पर्धेतील सांघिक व वैयक्तिक विजेते व उपविजेत्यांना करंडक व सुवर्ण/रौप्य पदक प्रदान करून गौरविण्यात आले. प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसुदन मराठे यांनी केले तर अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार यांनी आभार मानले.

सांघिक खेळांचे अंतिम निकाल - अनुक्रमे विजेता व उपविजेता : क्रिकेट– कोल्हापूर व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, व्हॉलिबॉल- छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, कबड्डी- पुरुष - पुणे-बारामती व कल्याण रत्नागीरी, महिला- सांघिक कार्यालय-भांडूप व पुणे-बारामती, खो-खो- पुरुष- पुणे-बारामती व कोल्हापूर, महिला- सांघिक कार्यालय-भांडूप व नाशिक-जळगाव, टेबल टेनिस - पुरुष- छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड व सांघिक कार्यालय-भांडूप, महिला- अकोला-अमरावती व कल्याण-रत्नागिरी, बॅडमिंटन - पुरुष- पुणे-बारामती व छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर, महिला- पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, कॅरम – पुरुष- छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, महिला- सांघिक कार्यालय-भांडूप व कोल्हापूर, ब्रिज- अमरावती-अकोला व छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर, टेनिक्वाईट- महिला- नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व कोल्हापूर.



1. अमरावती - महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती परिमंडल संघाने सर्वसाधारण अजिंक्यपद मिळवले. संचालक श्री. सचिन तालेवार व श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते मुख्य अभियंता सुनील काकडे, ज्ञानदेव पडळकर, भुपेंद्र वाघमारे, श्रीकृष्ण वायदंडे यांनी अजिंक्यपदाचा करंडक स्वीकारला.

2. अमरावती - महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत नागपूर-चंद्रपूर-गोंदीया परिमंडल संघाने सर्वसाधारण उपविजेतेपद मिळवले. संचालक श्री. सचिन तालेवार व श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते मुख्य अभियंता सुहास रंगारी, दिलीप दोडके, हरीष गजबे यांनी अजिंक्यपदाचा करंडक स्वीकारला'.

वैयक्तिक खेळांचे अंतिम निकाल (कंसात संघ)- अनुक्रमे विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे- 100 मीटर धावणे - पुरुष गट - गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व साईनाथ मसाने (सांघिक कार्यालय-भांडूप), महिला गट- प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व श्वेतांबरी अंबाडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया), 200 मीटर धावणे- पुरुष गट - गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व साईनाथ मसाने (सांघिक कार्यालय-भांडूप), महिला गट- प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व श्वेतांबरी अंबाडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) 400 मीटर धावणे- पुरुष गट - गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व रुपेश सकपाळ (सांघिक कार्यालय-भांडूप), महिला गट - श्वेतांबरी अंबाडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व माधुरी मडाले (अमरावती-अकोला), 800 मीटर धावणे- पुरुष गट - परेश चौधरी (नाशिक-जळगाव) व वैभव माने (कोल्हापूर), महिला गट - प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व स्वाती दमाने (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया), 1500 मीटर धावणे- पुरुष गट – एकनाथ घंगाळे (नाशिक-जळगाव) व हर्षल बोंद्रे (पुणे-बारामती), महिला गट- संजना शेजल (पुणे-बारामती) व माधुरी मडाले (अमरावती-अकोला), 5000 मीटर धावणे- पुरुष - एकनाथ घंगाळे (नाशिक-जळगाव) व आल्हाद निस्ताने (नागपूर-चंद्रपूर- गोंदीया), 4 बाय 100 रिले - पुरुष गट - प्रतीक वाईकर, सोमनाथ कांतीकर, अक्षय केंगाळे, गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व साईनाथ मसाने, रुपेश सकपाळ, विराज कोटंबकर, ओंकार गोठाळ (सांघिक कार्यालय-भांडूप), महिला गट – वेदश्री सोनवणे, रागिनी बेले, स्वाती दमाने, श्वेतांबरी अंबाडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व सोनिया मिठबावकर, सारिका जाधव, प्रिया पाटील, श्रेया जाधव (सांघिक कार्यालय-भांडूप), गोळा फेक - पुरुष गट – श्रीकांत धोत्रे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) व प्रवीण बोरावके (पुणे-बारामती), महिला गट - पूजा ऐनापुरे (कोल्हापूर) व प्रियांका शेळके (नाशिक-जळगाव), थाळी फेक- पुरुष गट – इम्रान मुजावर (कोल्हापूर) व धर्मेश पाटील (नाशिक-जळगाव), महिला गट- ज्योती कांबळे (कोल्हापूर) व प्रियांका शेळके (नाशिक-जळगाव), भाला फेक - पुरुष गट – बालाजी कांबळे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) व मिलिंद डोईफोडे (कल्याण-रत्नागिरी), महिला गट - अश्विनी जाधव (कोल्हापूर) व हर्षल मोरे (कल्याण-रत्नागिरी), लांब उडी - पुरुष गट – अक्षय कंगाळे (पुणे-बारामती) व नीलेश वैद्य (अमरावती-अकोला), महिला गट – प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व माया येळवंडे (पुणे-बारामती), उंच उडी - पुरुष गट – समीर मन्सूरी ( नाशिक-जळगाव ) व सतीश पाटील (कोल्हापूर), महिला गट – वेदश्री सोनवणे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व अश्विनी देसाई (कोल्हापूर), बुद्धिबळ - पुरुष गट – पंकज देशमुख (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) व संजय देवकाते (पुणे-बारामती), महिला गट- अमृता जोशी (सांघिक कार्यालय-भांडूप) व रंजना तिवारी (कल्याण-रत्नागिरी), कॅरम- पुरुष गट- अंकित बैसरे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व संजय कांबळे (पुणे-बारामती), महिला गट - पुष्पलता हेडाऊ (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व विजया माळी (कोल्हापूर) टेनिक्वाईट- महिला एकेरी – पुजा ऐनापुरे (कोल्हापूर) व मनीषा चौकसे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया), महिला दुहेरी - शीतल नाईक- कोमल सुरवसे (पुणे-बारामती) व वीणा पाटील-बिंदू रवीशंकर (कल्याण-रत्नागिरी),कुस्ती- 57 किलो – मतीन शेख (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर) व अनिल बागुल (नाशिक-जळगाव), 61 किलो- अश्विन मोरे (पुणे-बारामती) व विनोद गायकवाड (अकोला-अमरावती), 65 किलो - राजकुमार काळे (पुणे-बारामती) व विजय जगताप (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), 70 किलो- अनंत नागरगोजे (सांघिक कार्यालय-भांडूप) व सरदार हराळे (कल्याण-रत्नागिरी), 74 किलो- गुरुप्रसाद देसाई (कोल्हापूर) व अमोल मुंगळे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), 79 किलो- संदीप सवत (कोल्हापूर) व अकिल मुजावर (पुणे-बारामती), 86 किलो- हसनोद्दिन शेख (अकोला-अमरावती) व प्रशांत नाथे (नाशिक-जळगाव), 92 किलो- महेंद्र कोसारे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व बलराज अलाणे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), 97 किलो- अमोल गवळी (पुणे-बारामती) व हणमंत कदम (कोल्हापूर), 125 किलो – प्रविण बोरावळे (पुणे-बारामती) व वैभव पवार (छत्रपती संभाजीनगर-नांदेड-लातूर), शरीरसौष्ठव - 65 किलो- सुनील सावंत (कल्याण- रत्नागीरी) व शिवम चौघुले (कोल्हापूर), 70 किलो– गोपाल कुलकर्णी (कल्याण- रत्नागीरी) व अमित पाटील (कोल्हापूर), 75 किलो- नामदेव शिंदे (नाशिक- जळगाव), राजेंद्र जाधव (कल्याण-रत्नागिरी), 80 किलो- राहुल कांबळे (कोल्हापूर) व गोकुल सोनवणे (नाशिक- जळगाव), 90 किलो– प्रविण घुणके (कोल्हापूर) व कैलेश्वर सांगवे (पुणे-बारामती) आणि 90 किलोवरील वजनगटात मो. मुजाहिद अन्वर (अमरावती - अकोला) व अपुर्व शिर्के (कल्याण- रत्नागीरी), पॉवर लिफ्टिंग – 59 किलो- दीपक गांगुर्डे (नाशिक-जळगाव) व रवी निर्गणे (छत्रपती संभाजीनगर-नांदेड- लातुर), 66 किलो – तेजस आबाले (अमरावती-अकोला) व गोकुळ खैरनार (नाशिक-जळगाव), 74 किलो – मनीष कोंड्रा (पुणे- बारामती) व सागर जगताप (कोल्हापूर), 83 किलो – दिनेश धाडे (नाशिक- जळगाव) व मनिष सवालाखे (नागपूर-गोंदीया- चंदेरपूर), 93 किलो – प्रसाद हिरे (नाशिक- जळगाव) व महेश इंगोले (नागपूर- गोंदीया-चंदेरपूर), 105 किलो- श्रीकृष्ण इंगोले (नागपूर- गोंदीया- चंद्रपूर) व प्रवीण तायडे (अकोला-अमरावती)टेबल टेनिस - पुरुष एकेरी– सागर मातकर (मुख्यालय-भांडूप) व रितेश सवालाखे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया), पुरुष दुहेरी- सागर मातकर-मंगेश प्रजापती (मुख्यालय-भांडूप) व अविनाश पवार-सुनील राठोड (कल्याण-रत्नागिरी) महिला एकेरी - स्नेहल बढे (अकोला-अमरावती) व रंजना तिवारी (कल्याण-रत्नागिरी), महिला दुहेरी- स्नेहल बढे-कोमल पुरोहित (अकोला-अमरावती) व रंजना तिवारी-प्राची ठाकरे (कल्याण-रत्नागिरी), बॅडमिंटन - पुरुष एकेरी – भरत वसिष्ठ (पुणे-बारामती) व इम्रान तासगावकर (कोल्हापूर), पुरुष दुहेरी- भरत वसिष्ठ-पंकज पाठक (पुणे-बारामती) व दीपक नायकवडे-गुणवंत इप्पर (छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड), महिला एकेरी – अनिता कुलकर्णी (पुणे-बारामती) व वैष्णवी गांगरकर (पुणे-बारामती),महिला दुहेरी- वैष्णवी गांगरकर-अनिता कुलकर्णी (पुणे-बारामती) व ऋतिका नायडू-मृणाली(नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) ब्रिज-जोडी- विवेक मारोडे-अनुप पंडित (अकोला-अमरावती) व ब्रजेश गुप्ता-प्रशांत झाडे (अकोला-अमरावती), सांघिक - ब्रजेश गुप्ता, यज्ञेश क्षीरसागर, प्रमोद कांबळे, प्रशांत झाडे, विवेक मारोडे (अमरावती - अकोला)

## रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक ऑचल दलाल यांच्या हस्ते पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन केला गुणगौरव

**दैनिक युवक आधार**

**रसायनी(आनंद पवार):** रायगड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक श्रीमती. आंचल दलाल यांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर जिल्ह्यामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमीला व अवैध्यरित्या धद्यांना चांगलाच आळा बसला आहे.जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था सुरळीत रहावा व गुन्हेगारी पार्श्वभूमीचा बिमोड व्हावा म्हणून त्यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला आदेश दिले होते.परंतु जिल्ह्यात काही ठिकाणी चोरींचे प्रमाण वाढत असल्याने चोरींचे प्रमाण रोखण्यासाठी श्रीमती दलाल यांनी खास उपाय योजना राबवून जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला निर्देश दिले. जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी घरफोडी,चोरी असे प्रकार घडले आहेत आणि ते प्रकार पूर्णतःउघडकीस आणण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनच्या तपासीक पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी हे गुन्हे शंभर टक्के उघडकीस आणले आहेत अशा जिल्ह्यातील पोलीस अधिकारी कर्मचारी यांचे पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांनी सन्मानपत्र देऊन गौरव केल्याने रायगड पोलीस दलात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेले जवळपास १५ मोबाईल व अतिरिक्त पातळगंगा औद्योगिक क्षेत्रात असलेल्या सतवार कोटिंग कंपनीत




चोरीस गेलेला मुद्देमाल रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर,महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती अनुसया ढोणे, सहाय्यक फौजदार लालासाहेब कोळेकर, पोलीस हवलदार रंजीत खराडे,हेमंत कोकाटे, पोलीस कॉन्स्टेबल गिरीश नगरकर आदींनी पूर्णतः मुद्देमाल हस्तगत केल्याने रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांनी सन्मानपत्र देऊन कौतुक केले. खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.विशाल मेहुल रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनीही पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर,महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती. अनुसया ढोणे, सहाय्यक फौजदार लालासाहेब कोळेकर, पोलीस हवलदार रणजीत खराडे,हेमंत कोकाटे, पोलीस कॉन्स्टेबल गिरीश नगरकर यांचे अभिनंदन केले.

## ऑर्गनायझर शर्मिला केसरकर यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ 'मिले सुर मेरा तुम्हारा'हा संगीतमय कार्यक्रम उत्साहात संपन्न

### शर्मिला केसरकर जनजागृती सेवा संस्थेच्या"समाज रत्न पुरस्काराने" सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**डोंबिवली प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर**

ऐशी टक्के समाजकारण,वीस टक्के राजकारण,भाजपा चित्रपट कामगार आघाडीच्या डोंबिवलीच्या शहर अध्यक्षा, म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंटच्या संचालिका-ऑर्गनायझर शर्मिला केसरकर यांचा वाढदिवस डोंबिवली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.वाढदिवसाप्रित्यर्थ शनिवार दिनांक१५नोव्हेंबर२५रोजी सर्वेश हॉल, टिळक चौक, डोंबिवली पूर्व येथे म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत'मिले सुर मेरा तुम्हारा'हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेच्या"समाज रत्न पुरस्काराने" सन्मानित करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवा निवृत्त कमांडिंग ऑफीसर'ई'परिमंडळ, राष्ट्रपती पदक सन्मानित, समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष दिलीप नारकर, समुपदेशिका, स्वानंद इन्व्हेस्टाच्या संचालिका चित्रा राऊत, सेवा निवृत्त पोलिस अधिकारी, सिटीझन वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक सदस्य दीलीप शिरसाट, डोंबिवली येथील उषा हॉस्पिलिटीचे संचालक, समाजसेवक, जनजागृतीचे सल्लागार अरविंद




सुर्वे, महिला उत्कर्ष समिती महाराष्ट्रच्या कार्याध्यक्षा श्रुती उरणकर, ग्लोबल मालवणी संस्थेचे अध्यक्ष सचिन आचरेकर,साई श्रद्धा विविध कार्यकारी सेवा संस्थेचे अध्यक्ष तसेच आम्ही आहोत ना या सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष कैलास सणस, समाजसेविका शितल कदम, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवर उपस्थित होते.सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,शाल, भेटवस्तू, पुष्पगुच्छ असे समाजरत्न पुरस्काराचे स्वरूप होते.या ऑर्केस्ट्रा मध्ये सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह तनया केसरकर,स्पोर्ट्स/सिंगर बी.एन.नायक, सिंगर आणि आयडीएटर प्रज्ञा तांबे,सिंगर अनुराधा कोंडाळकर,विणा, अनुश्री चौधरी, जितेंद्र कांबळी, धनंजय बरबडे, अतुल खरे, अतुल देसाई,इंद्रनिल कंडु, नितीन ठाकर,श्री पेंडसे, भालचंद्र कोंडाळकर, मंगेश पारकर,रवी नाईक, उल्हास मैद, संजय पाटील,बाल कलाकार कियान,वॉईस ऑफ मुकेश राजेंद्र काळे, म्युझिक अरेंजर रितेश ॲण्ड टीम, व्हिडिओग्राफर संजय सेनगुप्ता या म्युझिक मंत्राच्या सर्व टीमने विशेष परिश्रम घेऊन हा सदाबहार सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीपणे सादर केला.या ऑर्केस्ट्राचे सुत्रसंचालन दिपक पोखरणकर यांनी केले.शेवटी म्युझिक मंत्राच्या संचालिका-ऑर्गनाझर शर्मिला केसरकर यांनी सर्वांचे आभार मानले.


## ज्येष्ठ उपासिका कासाबाई मल्हारी हाटकर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी - प्रकाश गवारे**

भैय्यासाहेब आंबेडकर नगर, देगावचाळ परिसरातील ज्येष्ठ उपासिका कासाबाई मल्हारी हाटकर यांचे दिनांक 16 नोव्हेंबर 2025 रोजी सायंकाळी 6:30 वाजता दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

कासाबाई हाटकर या धार्मिक वृत्तीच्या, भक्तिमय जीवन जगणाऱ्या आणि समाजात शांत, संयमी स्वभावामुळे ओळखल्या जाणाऱ्या व्यक्ती होत्या. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य म्हणून त्यांचा सन्मान सर्वत्र होता.

अंतिम संस्कारासाठीची मिरवणूक त्यांच्या राहत्या घरी —भैय्यासाहेब आंबेडकर नगर, देगावचाळ, नांदेड येथून 17



नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 11:00 वाजता निघणार असून गोवर्धन घाट, नांदेड येथे अंत्यविधी पार पडणार आहे. परिसरातील नागरिकांनी अंतिम विधीस उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली.

## स्नेहा अनिल तोडसाम यांची योगा खेळासाठी राष्ट्रीय स्तरावर निवड

**दैनिक युवक आधार**
**माहूर (प्रतिनिधी) सय्यद ईसा :** माहूर तालुक्यातील वानोळा येथील रहिवासी असलेल्या व सामाजिक कार्यकर्ता अनिल तोडसाम यांची मुलगी स्नेहा यांची योगा या खेळासाठी राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली असल्याने गावातून स्नेहाचे कौतुक करून अभिनंदन करण्यात येत आहे.राज्यस्तरावर गोल्ड मेडल मिळवल्यानंतर स्नेहाची राष्ट्रीय स्तरावर योगा या खेळासाठी निवड करण्यात आली आहे. स्नेहा इयत्ता आठवी वर्गात शिकत असून एकलव्य मॉडर्न रेसिडेंट स्कूल सहस्त्रकुंड तालुका किनवट येथे शिक्षण घेत आहे. स्नेहाने स्कॉलरशिप,नवोदय,एकलव्य अशा विविध परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवले आहे. नुकतेच राज्यस्तरावर झालेल्या योगा



या खेळातून राज्यस्तरीय गोल्ड मेडल जिंकल्यानंतर राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्याचे स्नेहाचे प्रशिक्षक सुमन फोगट हरियाणा यांनी कळविले आहे. लवकरच राष्ट्रीय स्तरावरील विविध खेळाचे आयोजन ओडिसा येथे होणार असल्याची माहिती ही प्रशिक्षक सुमन फोगट हरियाणा यांनी दिली आहे. स्नेहाची राष्ट्रीय स्तरावर योगा या खेळासाठी निवड झाल्याचे गावात कळताच स्नेहाचे आई मुक्ताबाई व वडील अनिल तोडसाम आणि परिवाराला आनंद मावेनासा झाला. तसेच स्नेहाचा या निवडीमुळे गावातून सरपंच सुनीता सिडाम, उपसरपंच अभिजीत राठोड, शिक्षक उत्तम सोनंकांबळे,पत्रकार पंडित धुप्पे,सय्यद ईसा सर (पत्रकार),मिलिंद तोडसाम,सोनू तोडसाम, एकलव्य मॉडर्न रेसिडेंट स्कूल सहस्त्रकुंड शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

## ई-सिगारेट विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** ई सिगारेट विक्रीप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि मिथलेश माणिकचंद साहू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.सी लाईन आयटीएम कॉलेजजवळील कॅफे नाईन पान शॉप आणि सौरभ पान शॉप सेक्टर चार, बेलपाडा, खारघर येथे कॅफे नाईन पान शॉपमध्ये अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि सौरभ पान शॉपमध्ये मिथलेश माणिकचंद साहू यांच्याकडे प्रतिबंधित सिगारेट सापडून आले. ३४ हजारांचे १७ई-सिगारेट पोलिसांनी जप्त केले. पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, तळोजा आदी परिसरात ई-सिगारेट खुलेआमपणे विकले आत आहेत. विशेष करून ज्या ठिकाणी कॉलेज आहेत त्या ठिकाणी पाई सिगारेटची विक्री होत असल्याचे समोर आले आहे.

## विवाहितेची आत्महत्या; दोघांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** विवाहितेने आत्महत्या केल्याप्रकरणी पती गिरीश बलर आणि सासू सुमन सुभद्रा कुवर यांच्याविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पूनम सिंग यांचे लग्न एप्रिल २०२५ मध्ये गिरीश वत्स यांच्याशी चंद्रपूर येथे झाले त खारघर सेक्टर ३५ जी येथे राहण्यासाठी आले, मात्र त्यांच्यात भांडणे होत होती. बाहेरून पैसे आणण्यासाठी तिच्या मागे तगादा लावत होते आणि तिला मानसिक त्रास देत होते. त्यामुळे तीने लोखंडी हुकाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी दोघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला .

## साडेपाच लाखांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** घराच्या गॅलरीतून घरात घुसून, घरातील सोन्याचे दागिने मोबाईल व रोख रक्कम अज्ञात इसमाने लुबाडली आहे. सव्वा पाच लाखांच्या या चोरीबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळोजा फेज १ मधील तळघराच्या एका घराच्या गॅलरीतून, एका अज्ञात इसमाने घरात प्रवेश केला. घरातील कपाटातून ५ लाख १० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, १५ हजार रुपयांचे मोबाईल व २० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण ५ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.